७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# सुनेत्रा पवार मुख्यमंत्री व्हावे असे वाटत असेल तर शुभेच्छा

## पण असे राजकीय वातावरण तापत नाही, गिरीश महाजनांचा राऊतांना टोला

**मुंबई (दै. संध्या)**

अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले असून, महायुतीच्या उमेदवार आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी रविवारी (१२ एप्रिल) प्रचाराचा नारळ फोडला. यावेळेस आयोजित सभेत राजकीय भाषणांपेक्षा भावनांचा कल्लोळ अधिक पाहायला मिळाला. मंत्री अदिती तटकरे यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांचे मुख्यमंत्रिपदाचे अपूर्ण राहिलेले स्वप्न सुनेत्रा वहिनींच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा मानस असल्याचे म्हटले होते. मात्र, याच विधानावरून आता शिवसेना ठाकरे गट आणि भाजपमध्ये वाकयुद्ध पेटले आहे.



सुनेत्रा पवारांच्या प्रचाराच्या पहिल्याच सभेत मंत्री आदिती तटकरे अत्यंत भावूक झाल्या होत्या. "आम्हा सर्व कार्यकर्त्यांची अजितदादांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याची इच्छा होती. दुर्दैवाने ते स्वप्न अधुरे राहिले, पण सुनेत्रा वहिनींच्या माध्यमातून आम्ही दादांचे हे स्वप्न पूर्ण होताना पाहू इच्छितो," असे विधान त्यांनी केले. या विधानाने राजकीय वर्तुळात सुनेत्रा पवार या आगामी मुख्यमंत्रीपदाच्या दावेदार आहेत का? अशा चर्चांना उधाण आले.

**संजय राऊतांचा 'मास्टरस्ट्रोक' आणि भाजपला टोला :**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या संधीचा फायदा घेत भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला. राऊत म्हणाले, "अजितदादांना मुख्यमंत्री होता आले नाही, पण जर भाजप सुनेत्रा वहिनींना मुख्यमंत्री करणार असेल, तर तो त्यांचा मोठेपणा आहे. देवेंद्र फडणवीस दिल्लीत जाण्यापूर्वी आपला वारसदार म्हणून एकनाथ शिंदेंऐवजी सुनेत्रा वहिनींचीच निवड करतात की काय? मला तर असे वाटतंय."

संजय राऊतांच्या या टीकेला भाजपचे संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांनी कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले. महाजन म्हणाले, "सुनेत्रा वहिनींनी मुख्यमंत्री व्हावे असे कोणाला वाटत असेल, तर त्यांना माझ्या शुभेच्छाच आहेत. पण संजय राऊत यांनी स्वतःच काही काळापूर्वी उद्धव ठाकरे हे पंतप्रधानपदाचे उमेदवार असल्याचे म्हटले होते, त्याचे काय? राऊतांच्या अशा बोलण्याने राजकीय वातावरण तापत नाही."

**'पवार' आणि 'ठाकरे' नावाचे वलय :**

दरम्यान, संजय राऊत यांनी शरद पवारांच्या नावाचा उल्लेख करत सुनेत्रा पवारांना आठवण करून दिली. "तुम्ही आज जे काही आहात, ते केवळ शरद पवारांमुळेच आहात. जसे आम्ही 'ठाकरे' या नावामुळे आहोत. बाळासाहेब ठाकरेंनी जे वैभव निर्माण केले, त्यामुळे आमची ओळख आहे.

तसेच बारामतीमध्ये 'पवार' नावाचे वलय हे शरद पवारांनीच निर्माण केले आहे, याचा विसर पडू देऊ नका. बारामती म्हणजे शरद पवार हे समीकरण विसरू नका," असे राऊत म्हणाले होते.

## पवारांच्या अस्तित्वाशिवाय बारामती आहे का?: त्यांच्यामुळेच तुम्ही राजकारणात आहात

**मुंबई (दै. संध्या)**

शरद पवारांच्या अस्तित्वाशिवाय बारामती आहे का? तुम्ही किती मोठे झाला असाल, अजितदादा असतील, सुनेत्रा पवार असतील, त्यांचे चिरंजीव असतील. तुम्ही आज राजकारणात उभे आहात ते शरद पवार यांच्यामुळे आहात. याचा विसर पडता कामा नये, असे मत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मांडले आहे.

संजय राऊत म्हणाले, तुम्ही आज राजकारणात उभे आहात ते शरद पवार यांच्यामुळे आहात. याचा विसर पडता कामा नये. तुम्ही कोण आहात? किंवा आम्ही कोण आहोत? आम्ही जे आहोत ते ठाकरेंमुळे आहोत आणि ठाकरे या नावाला वैभव आणि गौरव हा बाळासाहेब ठाकरे यांनी मिळवून दिला. तेच नसते तर आम्ही काय होतो?

**पवार म्हणजे शरद पवार, दुसरे कोणी नाही :**

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, आज तुम्हाला मोदी आणि शहा यांनी कोणालाही उभे केले असेल, पण शरद पवार नसते किंवा त्यांनी बारामती उभी केली नसती तर त्या पुढच्या कोणत्याही पवारांना महाराष्ट्रात कोणतेच स्थान मिळाले नसते. बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेना उभी केली नसती आणि कष्ट केले नसते तर आम्हाला सगळ्यांना या राज्यात काहीच करता आले नसते. त्यामुळे माणसाने किमान कृतज्ञता ही ठेवावी. पवार म्हणजे शरद पवार, पवार म्हणजे दुसरे कोणी नाही. त्यांचीच पुण्याई आहे, बारामतीसह सर्वत्र.

**पुढची निवडणूक बिनविरोध होणार नाही:**

ही निवडणूक आपण अजितदादांना श्रद्धांजली म्हणून पाहत आहोत. पुढची निवडणूक बिनविरोध होणार नाही, असेही संजय राऊत यांनी स्पष्ट केले. तसेच अजित पवारांचे मुख्यमंत्री पदाचे स्वप्न सुनेत्रा पवार पूर्ण करणार असे तटकरे म्हणत आहेत, यावर प्रतिक्रिया देताना राऊत म्हणाले, चांगली गोष्ट आहे. अजित पवारांना मुख्यमंत्री होता आले नाही. पण सुनेत्रा पवार यांना जर भाजप मुख्यमंत्री करणार असतील तर तो त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




**ब्रेकिंग न्यूज**

## कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल

नागपूर (दै. संध्या) : कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल. त्यामुळे मला यावर प्रतिक्रिया द्यायची नाही, असे कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते पार्थ पवार यांनी कॉंग्रेसवर टीका केली होती. यावर पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच ते राजकारणात अजून लहान आहेत, त्यामुळे मला त्यांच्यावर काही बोलायचे नाही, असेही पटोले यांनी म्हटले. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर टीका करताना नाना पटोले म्हणाले, संजय राऊत यांना त्यांच्याच पक्षात कोणी मान्यता देत नाही, त्यामुळे आम्ही त्यांना मान्यता द्यावी असे वाटत असेल तर त्यावर मी काही प्रतिक्रिया देणार नाही. पुढे बोलताना नाना पटोले यांनी भाजपवर टीका करताना म्हटले की, धर्मामध्ये आणि भाषेत भाजपने जे वाद निर्माण करून ठेवले आहेत. या मुंबईत देशाच्या आर्थिक राजधानीत गुजराती मराठी वाद निर्माण होणे यामागे भाजप आहे. राज्याला खऱ्या अर्थाने आपले राज्यातले मुख्यमंत्री नाही चालवत. गुजरातचे लोक चालवतात. कॉंग्रेसच्या काळात असा कुठलाही वाद कधीही झाले नाही. भाजपने पेरलेले हे विष आहे. ते आज भाषा या वादावर आणि मुंबईत ते पेटत आहे.

## डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकालाच विलंब का?

**मुंबई (दै. संध्या)**

आखातातील युद्धामुळे मुंबईतील इंदू मिलमधील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे काम आणखी वर्षभर लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी सरकारवर निशाणा साधत सरकार महामानवांच्या विचारांप्रती अनास्था का बाळगत आहे? असा सवाल केला आहे.

आखात इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्ध सुरू आहे. या युद्धामुळे तांबे व स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्याचा थेट फटका डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदूमिलमधील स्मारकाला बसला आहे.

त्यानुसार हे काम येत्या डिसेंबरपर्यंत होण्याची शक्यता नाही. त्याला आणखी वर्षभर लागण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला आहे.

**वेळकाढूपणा अन् जनतेची दिशाभूल थांबवा :**

विजय वडेट्टीवार सोमवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले की, महामानवांच्या विचारांप्रती सरकारची अनास्था. इंदू मिल येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आखाती युद्धाचे कारण पुढे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम रखडणे दुर्दैवी आहे.

## मी भाजपमध्ये गेलोच नाही, अजूनही मविआतच

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीचे रणमैदान तापलेले असतानाच, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी टाकलेल्या एका 'राजकीय बॉम्ब'मुळे महायुती आणि भाजपच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे. "मी अजून महाविकास आघाडी सोडलेली नाही आणि भाजपमध्येही प्रवेश केलेला नाही," असे स्पष्ट करत तनपुरे यांनी भाजपच्या अस्वस्थतेत भर घातली आहे. त्यांच्या या विधानाचा थेट परिणाम भाजप उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या मतदानावर होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

राहुरी पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांचा प्रचार सध्या जोरात सुरू आहे. अशातच निवडणुकीतून माघार घेतलेले प्राजक्त तनपुरे भाजपला साथ देतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, एका मुलाखतीत तनपुरे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत सर्वांनाच धक्का दिला. ते म्हणाले, "मी महाविकास आघाडी सोडलेली नाही. २०२९ च्या रणसंग्रामात मी पूर्ण ताकदीने उतरणारच आहे. सध्याच्या सरकारने माझे काही प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले असेल, तर त्याचा अर्थ मी महाविकास आघाडी कमकुवत केली असा होत नाही."

## प्रतिभा चाकणकर पोलिसांपुढे हजर

### पतसंस्थेतील २ कोटी ४० लाख रुपयांचा हिशोब देणार

**शिर्डी (दै. संध्या)**

भोंदू अशोक खरात प्रकरणी प्रतिभा चाकणकर शिर्डी पोलिस ठाण्यात हजर झाल्याची माहिती समोर आली आहे. प्रतिभा चाकणकर या रुपाली चाकणकर यांची बहीण असून त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल झालेला होता. अशोक खरातने जी खाती वापरली, त्या खात्यांमध्ये प्रतिभा चाकणकर यांच्यासह त्यांच्या मुलांच्या खात्यांचा सुद्धा समावेश होता. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता त्यांची चौकशी होणार आहे.



रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांना शिर्डी पोलिस ठाण्याने चार दिवसांपूर्वी नोटीस बजावली होती. समता पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक व्यवहारांप्रकरणी त्यांची चौकशी केली जाणार आहे. प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलांच्या नावे असलेल्या एकूण चार बँक खात्यांमधून तब्बल 2 कोटी 40 लाख रुपयांचे व्यवहार झाल्याची माहिती तपास यंत्रणांच्या हाती लागली असून, या मोठ्या रकमेच्या स्त्रोताबाबत आणि व्यवहारांच्या स्वरूपाबाबत आता पोलिस सखोल तपास करणार आहेत.

**खरात समता पतसंस्थेतील 100 खात्यांवर नॉमिनी :**


अशोक खरात हा समता पतसंस्थेतील 100 खात्यांवर, तर सिन्नर येथील जगदंब पतसंस्थेतील 32 खात्यांवर नॉमिनी असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. यापैकी सिन्नरमधील खात्यांची चौकशी नाशिक ग्रामीण पोलिस करत असून समता पतसंस्थेतील व्यवहारांचा तपास शिर्डी पोलिसांकडून सुरू आहे. याच तपासाच्या साखळीचा भाग म्हणून आता प्रतिभा चाकणकर यांची चौकशी केली जाणार आहे.

**पतसंस्थेच्या माध्यमातून आपला काळा पैसा पांढरा केल्याचा संशय:**

अशोक खरातने या पतसंस्थेच्या माध्यमातून आपला काळा पैसा पांढरा केल्याचा संशय आहे. कारण, समता पतसंस्थेत खरात नॉमिनी असलेले 100 हून अधिक खाती आढळलेत. ही खाती 57 वेगवेगळ्या लोकांच्या नावे आहेत. त्यावरून 60 कोटींहून अधिकचा व्यवहार झाला आहे. या प्रकरणी आतापर्यंत 33 खातेदारांची चौकशी पूर्ण झाली आहे. यापैकी बहुतांश लोकांना या पतसंस्थेत आपले खाते असल्याचेच माहिती नाही असा जबाब दिला आहे. आता प्रतिभा चाकणकर यांच्या चौकशीअंती काय माहिती समोर येते याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

**रुपाली चाकणकरांनाही एसआयटीकडून समन्स बजावल्याची माहिती :**

अशोक खरातशी असणाऱ्या कथित संबंधांवरून रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. त्यानंतर त्यांना सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला आघाडीच्या अध्यक्षपदावरही पाणी सोडावे लागले आहे. खरात प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने या प्रकरणी रुपाली चाकणकर यांना समन्स बजावल्याची माहिती आहे. पण त्याची पुष्टी होऊ शकली नाही. तूर्त सध्याचा घटनाक्रम पाहता त्यांचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे.



## संपादकीय

# तरुण आहे ‘आशा’ अजूनी...

महान गायक किंवा गायिकेसाठी वापरली जाणारी स्वर्गीय आवाज, अजरामर गायकी, विविधता, अष्टपैलुत्व वगैरे विशेषणे व उपमांची मर्यादा, शब्दांचे थिटेपण अधोरेखित करीत आशा भोसले यांनी जगाचा निरोप घेतला. आठ दशकांपेक्षा अधिक काळ सरस्वतीची आराधना, हिंदी-मराठीसह तब्बल वीस भाषांमध्ये विक्रमी बारा हजारांहून अधिक गाणी, गिनीज बुकमध्ये नोंद, झाडून सारे पुरस्कार या भौतिक यशाच्या पलीकडे, त्याहून काहीतरी अधिक आशाताईंमध्ये होते. व्यक्ती म्हणून आयुष्यभर त्या मनमोकळ्या, बिनधास्त आणि आरपार पारदर्शक राहिल्या. प्रसिद्ध मंगेशकर घराण्याच्या परंपरागत गायकीला त्यांनी धक्का दिला. चौकटी तोडल्या. भारतीय व पाश्चात्त्य गायकीचा समन्वय साधून त्यांनी स्वत:ची वेगळी शैली विकसित केली. तिला हिमालयाची उत्तुंग उंची मिळवून दिली. त्यांची ही शैली, त्यांचे गाणे, त्यातील हरकतींनी जगाला वेड लावले. हे सहज, नैसर्गिकपणे घडले नाही. गायिका म्हणून ती आशाताईंची गरज होती. प्रयोगशीलता त्या गरजेतून आली. त्या हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावत होत्या तेव्हाचा काळ चित्रपटांच्याही बाल्यावस्थेचा होता. थोरली बहीण लतादीदी तसेच गीता दत्त, शमशाद बेगम यांच्या गायनाची मोहिनी होती. लतादीदींचा मुलायम, गोड स्वर आणि गीता दत्त व शमशाद बेगमचा अनुनासिक पारंपरिक आवाज हीच चित्रपट गायनाची ओळख होती. फाळणीवेळी नूरजहाँ बेगम पाकिस्तानला निघून गेल्या, तरी त्यांचा भारतातील प्रभाव कायम होता. वयाच्या दहाव्या वर्षी, १९४३ मध्ये ‘माझा बाळ’ चित्रपटात संगीतकार दत्ता डावजेकरांसाठी समूहगीत गाऊन आशाताईंनी या क्षेत्रात पाऊल ठेवल्यानंतर बरीच वर्षे त्या लतादीदींच्या सावलीत होत्या. त्या गायच्यादेखील लतादीदींसारख्याच. परिणामी, वाट्याला गाणी कमी यायची. तसेही मोठ्या वृक्षाखाली लहान रोपटी खुरटून जातात, हे त्रिकालबाधित वास्तव आहे. आपण तसे खुरटून जाऊ नये, वेगळे स्थान तयार करावे, यासाठी आशाताईंनी परंपरागत गायकीचा पडदा झुगारून दिला. आवाजात धार, उत्साह, चैतन्य आणले. शमशाद बेगमसोबत ‘लेके पहला पहला प्यार’ या १९५६ च्या ‘सीआयडी’मधील गाण्याने आवाजाची नवी जादूगार आल्याचा सांगावा त्यांनी दिला होता; पण तो पुरेसा नव्हता. नव्या प्रयोगांची गरज आशाताईंनी ओळखली. त्याचवेळी चित्रपटसृष्टीनेही आधुनिकतेची कास धरली. जॅझ, रॉक, डिस्को, कॅबरे असे संगीत-नृत्याचे प्रयोग होऊ लागले. गाण्यात व जगण्यात अधिक मेलडी आली. अवखळ, खट्याळ नायिका पडद्यावर अवतरल्या. त्यांच्यासाठी आशा भोसले तंतोतंत योग्य गायिका ठरल्या. आधी ओ. पी. नय्यर यांनी आणि १९८० नंतर राहुल देव बर्मन यांनी आशाताईंचे प्रयोग उचलून धरले. त्या अष्टपैलू गायकीला बहार आली. सत्तरचे दशक ‘पिया तू अब तो आजा’, ‘दम मारो दम’, ‘चुरा लिया है तुमने’, ‘ये मेरा दिल’ किंवा ‘आजा.. आजा मैं हूँ प्यार तेरा’ अशा अजरामर गाण्यांनी गाजले, तर ऐंशीनंतरच्या दोन दशकांमध्ये ‘उमराव जान’मधील ‘दिल चीज क्या है’ व ‘इन आँखो की मस्ती के, मस्ताने हजारो है’ यांसारखी अगदी कालची वाटावीत अशी गाणी आली. ‘लगान’मधील ‘राधा कैसे न जले’, अशा गाण्यांनी शिक्कामोर्तब केले की आशा भोसले नावाच्या आवाजाचा झरा अजूनही खळाळता आहे. त्या थकलेल्या नाहीत. जिवंतपणीच त्या आख्यायिका बनल्या. त्यांचा आवाज अखेरपर्यंत चिरतरुण राहिला. ‘तरुण आहे रात्र अजूनी’, हे नुसते शब्द राहिले नाहीत. त्यांच्या गळ्याने त्या शब्दांना अमरत्व दिले. ..आणि आपण मराठी माणसे यासाठी भाग्यवान, की त्या अमृताचे सर्वाधिक कुंभ आशाताईंनी मातृभाषेत रिते केले. कुंभ कसले, त्यांचा कंठ अमृताचा अस्सीम साठा होता. श्रद्धायुक्त भजने व भक्तिगीते, प्रभातगीते, धीरगंभीर भावगीते, अवखळ बालगीते, रांगडी लोकगीते, ठसकेबाज लावण्या, रंगमंचीय सवाल-जबाब, शास्त्रीय-उपशास्त्रीय बाजाची नाट्यगीते, बेधुंद तरुणाईची द्वंद्वगीते, मखमली भावनांची श्रृंगारगीते असे गायनप्रकार त्या अमृताच्या धारा बनल्या. मराठी माणसाचे जगणे अक्षरश: सुंदर झाले. अजाणत्या बालकांपासून ते ‘उष:काल होता होता काळरात्र झाली’ या शब्दांनी क्रांतीच्या मशाली पेटविणाऱ्या प्रौढांपर्यंत साऱ्यांनी आपली आयुष्ये आशाताईंच्या गाण्यांनी काठोकाठ भरून घेतली.

## संस्कृत सुभाषित

विद्वत्वं दक्षता शीलं संस्कारान्तिरनुशीलम् ।
शिक्षकस्य गुणा: सप्त सचेत्सत्वंप्रसन्नता ।

अर्थ : विद्वत्ता, दक्षता, चारित्र्य शील, संस्कार, करण्याची क्षमता, दयाळूपणा, चैतन्य आणि प्रसन्नता असे ते सात गुण आहे. आदर्श शिक्षकाच्या ठिकाणी आवश्यक असणारे गुण.

## गुरु वचन

### सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे-श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल.

आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती-प्रेम-समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच मानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सदगुण-संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.

## उपदेशकथा

### राक्षस वृत्ती

एकदा एका जंगलातील तळ्यावर एक कोकरू पाणी पीत होते, त्याचवेळी तेथे एक लांडगा आला. कोकराला पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले पण कोकराला खाण्यासाठी काय कारण सांगायचे हे त्याला समजेना. तो कोकराला म्हणाला, ‘काय रे मला पाणी पिता येऊ नये म्हणून तू हे पाणी गढूळ करतोस होय? थांब मी तुला खाऊन टाकतो.’ पण ते कोकरू म्हणाले, ‘मी जीभेच्या टोकाने पाणी पीत आहे तर हे पाणी गढूळ होईलच कसे?’ हे कारण फुकट गेलेले पाहून लांडगा म्हणाला, ‘गेल्या वर्षी तू माझ्या वडिलांचा अपमान केलास, तुला चांगली शिक्षा केली पाहिजे.’ कोकरू म्हणाले, ‘लांडगेदादा, गेल्या वर्षी माझा जन्म झाला नव्हता.’ ‘तुला उत्तरे काय छान देता येतात. पण थांब, मी तुझा आता फडशा पाडून टाकतो’, असे सांगून लांडग्याने कोकराला ठार मारले.

कथा उपदेश : माणसाने एखाद्याच्या पाठीत चाकू खुपसण्याचा निश्चय केला तर तो कोणत्याही न्याय्यवजा व्यक्तीकडे कानाडोळा करतोच.

## पंचांग

| | |
|---|---|
| १४ एप्रिल २०२६ | करण:तैतिल |
| मंगळवार | २४:१२:३६+ |
| विक्रम संवत्- २०८२ | सूर्य:मेष ०९:२९:५६ |
| चैत्रशके संवत्- १९४८ | चन्द्र:कुम्भ |
| संवत्सर -पराभवनाम | हिजरी सन् - १४४६ |
| अयन- उत्तरायणारंभ | मुस्लिम मास - शव्वाल |
| मास- चैत्र | तारीख - २५ |
| ऋतु- सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | भारतरत्न डॉ. बाबा |
| तिथि:द्वादशी | साहेब आंबेडकर जयंती |
| २४:१२:३६+ | तिथिवासर सकाळी. |
| नक्षत्र:शतभिषा | ६. ५४ पर्यंत |
| १६:०५:४३ | वैशाखी (पंजाब) |
| योग:शुक्ल १५:३८:५८ | मुक्ताबाई यात्रा - |
| करण:कौलव १२:४६:४० | नारायणगाव (पुणे) |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९१८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | | 3 | | | | | |
| | | 9 | | | | 2 | | 3 |
| 2 | 3 | | 5 | 8 | 9 | | | |
| 5 | 9 | | 8 | 1 | 2 | | | |
| | | 8 | 7 | | 3 | 9 | | |
| | | | 9 | 5 | 4 | | 1 | 6 |
| | | | 2 | 3 | 6 | | 7 | 8 |
| 8 | | 1 | | | | 3 | | |
| | | | | | 8 | | 5 | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९१७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 6 | 9 | 5 | 2 | 4 | 1 | 8 |
| 4 | 1 | 9 | 6 | 8 | 3 | 7 | 5 | 2 |
| 8 | 5 | 2 | 4 | 1 | 7 | 9 | 3 | 6 |
| 6 | 8 | 3 | 1 | 2 | 9 | 5 | 7 | 4 |
| 1 | 2 | 5 | 7 | 4 | 8 | 3 | 6 | 9 |
| 9 | 4 | 7 | 5 | 3 | 6 | 2 | 8 | 1 |
| 3 | 9 | 8 | 2 | 7 | 1 | 6 | 4 | 5 |
| 5 | 6 | 1 | 3 | 9 | 4 | 8 | 2 | 7 |
| 2 | 7 | 4 | 8 | 6 | 5 | 1 | 9 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८२८ - नोआह वेब्स्टरने डिक्शनरीचा कॉपीराईट नोंदवला.
- १८६० - पोनी एक्स्प्रेसचा पहिला घोडेस्वार साक्रामेंटो, कॅलिफोर्निया येथे पोचला.
- १८६५ - जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसऱ्या दिवशी मृत्यू पावला.

### राष्ट्रीय

- १९४४ - मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.
- २००६ - दिल्लीतील ऐतिहासिक जामा मशिदीत दोन बॉंबस्फोटात १२ जण जखमी झाले.
- २००८ - बंगाली नववर्षदिनाचे औचित्य साधून कोलकाता-ढाका मैत्री एक्स्प्रेसला परराष्ट्र व्यवहार मंत्री प्रणव मुखर्जी यांनी हिरवा झेंडा दाखविला. मैत्री एक्स्प्रेसमुळे भारत आणि बांगलादेश या दोन शेजारी देशांमधील रेल्वेसेवा ४३ वर्षांच्या खंडानंतर पुन्हा सुरू झाली.

### जन्म

- १३३६ - गो-कोगोन, जपानी सम्राट यांचा जन्म.
- १५७८ - फिलिप तिसरा, स्पेनचा राजा यांचा जन्म.
- १७४१ - मोमोझोनो, जपानी सम्राट यांचा जन्म.
- १८६६ - ॲन सुलिव्हान, हेलन केलरची शिक्षिका यांचा जन्म.
- १८९१ - बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार यांचा जन्म.

### निधन

- ०७११ - फ्रांसचा राजा चाईल्डेबर्ट तिसरा यांचे निधन.
- १५९९ - हेन्री वॅलप, इंग्लिश राजकारणी यांचे निधन.

## : SMS :

To live a life i need
a heartbeat,
2 have a heartbeat
i need a heart,
2 have a heart i
need happiness,
2 have happiness
i need a friend
&
4 a friend i need U!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.३ | २५.७ |
| अहमदनगर | ३८ | २४.८ |
| अकोला | ३८.४ | २४.९ |
| अमरावती | ३७.२ | २३.४ |
| बीड | ३९.४ | २४.७ |
| भंडारा | ३९.३ | २२.३ |
| बुलढाणा | ३१.२ | १८.५ |
| चंद्रपूर | ४०.५ | २५.३ |
| चेन्नई | ४१.२ | ३२.८ |
| नवी दिल्ली | ३१.६ | २१.१ |
| धुळे | ३६.३ | २२.५ |
| गोंदिया | ३७.६ | २३.६ |
| जळगाव | ३८.८ | २२.२ |
| कोल्हापूर | ३८.१ | २२.७ |
| लातूर | ३६.९ | २३.८ |
| मुंबई | ३८ | २७.१ |
| नागपूर | ३७.६ | २२.९ |
| नांदेड | ३८.३ | २५.३ |
| नंदूरबार | ३५.७ | २३.५ |
| नाशिक | ३६.९ | २२ |
| पुणे | ३६.८ | २२.६ |
| पंढरपूर | ४०.२ | २८.२ |
| सातारा | ३८.३ | २१ |
| सांगली | ३९.७ | २५.३ |
| सोलापूर | ४०.४ | २८.६ |
| वर्धा | ३८.६ | २४.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण व्यक्तीच्या सहवासामुळे बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

**वृषभ :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका.


**धनु :** शुभ रंग:जांभळा,शुभ दिशा:दक्षिण शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा.

**मकर :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९१८



### आडवे शब्द

२. वार्ताहर
६. शीण
९. गाय
१०. मोफत
११. जोरात भांडण
१३. नाराजी
१५. उकळी, उमाळा
१७. गुप्तचर, जासूस
१८. अचेतन
१९. गाणे
२१. नांगर
२२. जबाबदारी
२३. अडथळा, पाचर
२४. भंगुर
२५. शांतता
२७. रमलेला, एकरूप
२८. पारंगत
३१. टिकाऊ
३२. रस्ता
३३. आपल्या देशाची राजधानी
३४. कावीळ
३७. हाणामारी
४०. असंमती
४२. त्रास, मेहनत
४४. प्रशंसा
४६. शरीरातून आरपार जाणारे किरण
४७. पायऱ्या असलेली विहिर
४८. धाक
५०. विस्तव
५२. डाळीचे कालवण
५३. महिला
५४. अभिमान
५६. विद्ध
५७. महादेव
५८. मर्यादा
५९. जावई
६१. रामजन्माक्षी तिथी
६३. प्रदेश, परिसर
६५. आश्रय
६७. लोभ
६८. संताप
७१. अनुमान, कल्पना
७२. पेच
७३. ढग
७५. ढीग
७७. लोकसंख्या मोजणे
७९. ठाऊक
८०. शैली
८१. थोडे
८२. प्रथा
८३. शरीर, उपजत कौशल्य
८४. किंचित
८५. पश्चिम दिशा, सूर्य मावळतो ते स्थान

### उभे शब्द

१. सहजी आकलन न होणारे
२. लहानपण
३. लवण
४. कोरडे, रूक्ष
५. नागाची एक जात
७. दया यावी असे
८. गंध, परिमळ
१०अ. ठोंब्या, निर्बुद्ध
१२. गीते लिहिणारा
१४. सरस्वती, शारदा
१६. प्रिय स्त्री
२०. होडी
२२. अरण्य
२६. रमलेला
२७. पुराणातील घोडागाडी
२८. गर्क
२९. नोकरी नसलेला
३०. बस्तान
३१. आवाजी गोंधळ
३२. परीक्षा घेणारा
३५. लज्जास्पद
३६. एक मापी परिमाण
३८. राज्यसुख
३९. शेवटच्या प्रस्थानापूर्वी केलेली आवराआवर
४१. कारखान्याचा मालक चालक
४३. दया
४५. खात्री
४९. अचूक (प्रत्युत्तर)
५१. नौदल
५४. झेंडा
५५. मोलकरीण
५९. जगातील, जगाच्या संदर्भातील
६०. त्यानुसार
६१. पती
६२. कृष्णभक्त कवयित्री
६४. कृष्णाची दुष्ट मावशी
६६. श्रीराम
६९. गोंगाट
७०. समजायला सेपे
७४. गाव
७६. अखंड
७८. समाविष्ट
७९. पूर्वग्रह, प्रतिकूल ग्रह
८१. खाल्ल्यास पड

### जम्बो शब्दकोडे क्र. ९१६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.प्रगती ४.शिकरण ७.गगन १०.प्रणय ११.अनल १३.डास १५.वसन १७.पाव १८.गावसकर २०.नानकटाई २४.बडवा २७.कमजोर ३१.तराजू ३४.इडली ३६.दबाव ३७.पारख ३९.नतमस्तक ४०.सन ४१.काशी ४३.वाडगा ४५.डेरा ४८.रस ५०.तजवीज ५३.जास्त ५५.द्रव्यहीन ५८.टग्या ५९.रज ६०.मदत ६१.वखार ६२.खोपा ६३.जाहीर ६४.लता ६५.हतबल ६७.फक्त ६८.रमणी ६९.वरात ७१.बीट ७२.सखी ७३.वन्य ७५.लवकर ७८.रबर ८०.शेपू ८१.आसपास ८३.पर ८४.खळ ८५.श्री ८६.पावा ८७.कबड्डी ८८.सकस ९२.चॅपलीन ९३.रेखा ९४.लवाद

उभे उत्तर : १.प्रणव २.गय ३.मानस ५.कडा ६.रसना ८.गवई ९.नस १०.प्रपाठक ११.अवधी १२.लकब १४.काक १६.नक्की १९.रडतखडत २१.नळी २२.टाच २३.आजोबा २५.वारा २६.गोड २८.मदन २९.रवका ३०.वपा ३२.जून ३३.अंमल ३४.इकडे ३५.लीला ३८.रवा ४०.सच्छिद्र ४२.शीर ४४.गाजरपारखी ४६.राजा ४७.बाही ४९.सटरफटर ५१.वीज ५२.पदरव ५४.स्तब्धता ५६.व्यथित ५७.नवल ६०.मही ६३.जाणीवपूर्वक ६४.लत ६५.हकालपट्टी ६६.बलाक ७०.राक्षस ७२.सर ७४.मास ७६.वर ७७.रखवाली ७९.बकबक ८१.आज्ञा ८२.पाठिंबा ८६.पाप ८८.सखा ८९.सल ९०.मंद ९१.जीत

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# कमला नेहरू रुग्णालयात शस्त्रक्रिया दीडपट वाढ

## सुधारित सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांमुळे रुग्णसंख्या वाढली; आरोग्यसेवेवर नागरिकांचा वाढता विश्वास






**पुणे (दै. संध्या)**

महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात निधी, तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता आणि अद्ययावत सुविधांमुळे आरोग्यसेवेचा दर्जा उंचावला आहे. परिणामी, रुग्णांना दुसरीकडे पाठविण्याचे प्रमाण घटले असून, उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे. गेल्या तीन महिन्यांत शस्त्रक्रियांची संख्या तब्बल दीडपट वाढल्याचे समोर आले आहे.

महापालिकेच्या मंगळवार पेठेतील 300 खाटांच्या कमला नेहरू रुग्णालयाने अलीकडच्या काळात अनेक सुधारणा घडवून आणल्या आहेत. रुग्णालयात 24 तास तातडीच्या सेवा उपलब्ध असून, विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या वाढली आहे. यामध्ये अस्थिव्यंगोपचार, स्त्रीरोग व प्रसूती, बालरोग, सर्वसाधारण वैद्यक, भूलतज्ज्ञ तसेच मानसोपचार या विभागांचा समावेश आहे. त्यामुळे सर्वसामान्य व मध्यमवर्गीय नागरिकांसाठी हे रुग्णालय अधिक विश्वासार्ह पर्याय ठरत आहे.

महापालिकेकडून सुमारे 13 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर रुग्णालयातील पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा करण्यात आली. यामध्ये 100 खाटांची वाढ, 25 नवीन तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती, अतिदक्षता विभागाचे नूतनीकरण, शस्त्रक्रिया कक्षांचे सक्षमीकरण, सौरऊर्जा प्रणाली तसेच रुग्ण व नातेवाईकांसाठी सोयीसुविधा यांचा समावेश आहे. या सुधारणांचा थेट परिणाम रुग्णसेवेच्या गुणवत्तेवर झाला आहे.

ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 या कालावधीत बालरोग विभागातील 19 रुग्णांना बाहेर पाठवावे लागले होते, तर जानेवारी ते मार्च 2026 दरम्यान ही संख्या 9 वर आली आहे. तातडीच्या कक्षातील रेफरल 380 वरून 313 वर, तर स्त्रीरोग विभागातील रेफरल 175 वरून 131 वर घसरले आहे. शस्त्रक्रियांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 या कालावधीत 1486 शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. तर जानेवारी ते मार्च 2026 या कालावधीत ही संख्या वाढून 1952 वर पोहोचली आहे. अद्ययावत सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपलब्धतेमुळे रुग्णसंख्या वाढत आहे. नागरिकांचा रुग्णालयावरील विश्वास अधिक बळकट होत असून, कमला नेहरू रुग्णालय शहरातील सक्षम व विश्वासार्ह आरोग्य केंद्र म्हणून विकसित होत आहे.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी भवानी पेठ मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर

**पुणे (दै. संध्या)**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळ्याचा पुणे येथील भवानी पेठ मंदिर मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर पडला असून मुक्काम इतरत्र हलविणे वा सध्याच्या जागेतील उपाय योजनांबाबत ठोस अधिकृत हमी देणारा प्रस्ताव कोणाकडून आला नसल्याचे सांगत आळंदी देवस्थानने याबाबतचा निर्णय पुढे ढकलला आहे.येत्या १ मे रोजी यावर अधिकृत निर्णय घेऊ असे देवस्थानने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून म्हंटले आहे.

देवस्थानने भवानी पेठ मुक्काम ठिकाणी सोयी,सुविधांबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी,भवानी पेठ पालखी विठ्ठल मंदिर विश्वस्त यांच्याशी बैठक पार पडली त्यात योग्य त्या उपाय योजना देवस्थान तर्फे सुचविण्यात आल्या आहेत.

मात्र १२ एप्रिल पर्यंत मुक्कामाबाबत कोणताही ठोस अधिकृत हमी देणारा प्रस्ताव कोणाकडूनही आलेला नाही. त्यामळे संस्थान कमिटीला पालखी सोहळा समाजाला कोणतीही खात्री तुर्तास देता येणार नाही.

प्रशासन, लोकप्रतिनिधी, भवानीपेठ पालखी विठ्ठल मंदिर विश्वस्त, दिंडी संघटना पदाधिकारी, श्रीगरू हैबतरावबाबा यांचे वंशज प्रतिनिधी,श्रीमंत उर्जितसिंह शितोळेसरकार मानकरी,सेवेकरी व संस्थान विश्वस्त यांची संयुक्त बैठक प्रशासनाच्यावतीने पूढील ८ दिवसांत आयोजित करण्यात येणार आहे. सदर बैठकीत चर्चेअंती सूविधा व उपाययोजनाबाबत अधिकृत प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पालखी सोहळा दिंडी समाजाच्यापूढे हा प्रस्ताव २६ एप्रिल रोजी पंढरपूर मुक्कामी चर्चेला ठेवण्यात येईल.

## पुण्यात १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ‘संयुक्त अभिवादन’

### राज्य व केंद्रातील मान्यवरांची उपस्थिती; नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन



**पुणे (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती, पुणे’ यांच्या वतीने मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता भव्य ‘संयुक्त अभिवादन’ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात राज्य व केंद्र सरकारमधील मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत.

या सोहळ्यास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, पार्थ पवार, मेधा कुलकर्णी यांच्यासह पुण्यातील सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत.


तसेच पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा हे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय विविध पक्षांचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे (काँग्रेस), धिरज घाटे (भाजप), सुनील टिंगरे (राष्ट्रवादी काँग्रेस), गजानन थरकुडे (शिवसेना उ.बा.ठा.), रवींद्र धंगेकर (शिवसेना) आणि श्रीकांत पाटील (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी) हेही उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे नियोजन उपमहापौर परशुराम वाडेकर, अध्यक्ष राहुल डंबाळे, डॉ. सिद्धार्थ धेंडे, नगरसेवक अविनाश साळवे आणि बाळासाहेब जानराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. पुणे शहर व परिसरातील नागरिकांनी या अभिवादन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवाला अभिवादन करावे, असे आवाहन जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नोंदणी विभागाची ई-सर्च सेवा पूर्ववत; आयपी मर्यादा 150 पर्यंत वाढ

### संकेतस्थळ दुरुस्तीनंतर वेग वाढला; मिळकतींचा शोध अधिक सुलभ झाला



**पुणे (दै. संध्या)**

नोंदणी विभागाची ठप्प झालेली ई-सर्च सुविधा दुरुस्ती आणि सुधारणेनंतर पूर्ववत करण्यात तंत्रज्ञांना यश आले आहे. या सुधारणेमुळे प्रत्येकाला दररोज किमान चार ते पाच मिळकतींचा शोध घेणे आता शक्य होणार आहे. गेल्या आठवड्यात नोंदणी विभागाचे हे संकेतस्थळ ठप्प झाल्याचे वृत्त दै. ‘पुढारी’ने दिले होते. त्याची दखल घेत या विभागाने या संकेतस्थळाच्या सॉफ्टवेअरची दुरुस्ती करून त्यात सुधारणा केल्या. त्यामुळे मिळकतींचा शोध घेण्यासाठीची ही सुविधा आता पूर्ववत सुरू झाली आहे.

एकाच आयपी अॅड्रेसवरून अनेकवेळा हे संकेतस्थळ वापरण्याचे प्रयत्न होत असल्याने त्यावर अतिरिक्त ताण येऊन त्याचा वेग मंदावत होता. त्यामुळे काही वेळा ते ठप्प होत असे, असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे त्यात दुरुस्ती करण्याबरोबरच एकाच आयपी अॅड्रेसवरून त्याच्या वापरावर निर्बंध घालण्याची सुधारणाही त्यात करण्यात आली आहे, अशी माहिती नोंदणी विभागाचे उपमहानिरीक्षक (आयटी) अभयसिंह मोहिते यांनी दै. ‘पुढारी’शी बोलताना दिली. मिळकतींचा शोध घेण्यासाठी एका आयपी अॅड्रेसवरून दिवसाकाठी फक्त दहा वेळाच या संकेतस्थळाचा वापर करता येईल, असा बदल नोंदणी विभागाने सुरुवातीला केला होता. पण हा बदल मिळकतींच्या शोध अहवालासाठी पुरेसा नसल्याची बाब अॅड. कैलास थोरात आणि अॅड. निलेश टुले यांनी मोहिते यांच्या निदर्शनास आणून दिली. एका मिळकतीचा शोध अहवाल देण्यासाठी 30 वर्षांतील फेरफारांची माहितीची गरज असते. प्रत्येक वर्षातील नोंदीसाठी किमान एकदा तरी संकेतस्थळावर जावे लागते, हे विचारात घेता 10 वेळा संकेतस्थळ वापराची मर्यादा खूपच कमी आहे, हे त्यांनी पटवून दिले. त्यामुळे मोहिते यांनी ही मर्यादा आता दहावरून दीडशेपर्यंत वाढवली आहे.

## पुण्यात भोंदूबाबाकडून महिलेवर अत्याचार; 50 लाखांची लूट

**पुणे (दै. संध्या)**

गात दैवी शक्ती आहे, अशी बतावणी करीत एका भोंदूने विवाहित महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार करून तिच्याकडून तब्बल 50 लाखांहून अधिक रक्कम उकळल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, आरोपी औदुंबर मनोहर गडदे (रा. पंढरपूर, जि. सोलापूर) याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. पीडित 42 वर्षीय महिला कौटुंबिक वादामुळे पतीपासून वेगळी राहात होती. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत गडदेने स्वतःला देवऋषी असल्याचे सांगत तिचा विश्वास संपादन केला. तुमच्या अडचणी दूर करतो, जीवन सुरळीत करतो, अशी गोड बोलणी करीत त्याने महिलेला जाळ्यात ओढले. यानंतर स्वारगेट परिसरातील लॉजवर बोलावून तिच्यावर लैंगिक



अत्याचार केला.


एवढ्यावरच न थांबता माणगाव येथेही तिला नेऊन पुन्हा अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. नोकरी लावतो, बांधकाम व्यवसायात मोठा फायदा करून देतो, या आमिषाखाली आरोपीने महिलेकडून वेळोवेळी 50 लाख 55 हजार रुपये उकळले. काही रक्कम रोख, तर काही दागिन्यांच्या स्वरूपात घेतल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे हा प्रकार तब्बल पाच ते सहा वर्षे सुरू होता.

# रेस्क्यू फाउंडेशनमधून 12 बांगलादेशी महिलांचे पलायन

**पुणे (दै. संध्या)**

वेश्याव्यवसायाच्या नरकातून बाहेर काढून सुरक्षित आश्रय देण्याचा दावा करणाऱ्या महंमदवाडी येथील रेस्क्यू फाउंडेशनमधून 12 बांगलादेशी महिलांनी पलायन केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच समोर आला आहे. तब्बल 20 दिवसांपूर्वी घडलेला हा प्रकार दडपण्याचा प्रयत्न झाल्याने विविध स्तरांतून संताप व्यक्त होत आहे. 23 मार्चच्या रात्री पळून गेलेल्या 12 बांगलादेशी तरुणींपैकी दोघींना त्याच दिवशी सय्यदनगर परिसरातून पुन्हा ताब्यात घेण्यात आले. मात्र, 10 महिला अजूनही फरार आहेत. या प्रकारास जबाबदार असणाऱ्या कोणाहीविरुद्ध अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

रेस्क्यू फाउंडेशनच्या कायदेशीर रखवालीतून पळालेल्या या सर्व महिला 23 ते 33 वयोगटातील आहेत. शहर आणि जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या कुंटणखान्यांतून त्यांची सुटका केली होती. न्यायालयाने 18 मार्च रोजी या महिलांना बांगलादेशात परत पाठविण्याचे आदेश दिले होते. त्यासाठी दूतावासाशी समन्वय सुरू असतानाच रेस्क्यू फाउंडेशनची सुरक्षाव्यवस्था भेदून त्यांनी पलायन केल्याने तेथील सुरक्षाव्यवस्था व पोलिस बंदोबस्ताबाबतचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एका बांगलादेशी तरुणीने 23 मार्च रोजी सकाळी साडेसहा वाजता पोटदुखीचे नाटक करीत केअरटेकरला बोलावले आणि तिच्याकडे औषधाची मागणी केली. त्यानंतर औषध घेऊन आलेल्या केअरटेकरवरच तिने झडप घातली. त्यानंतर तिच्या




मैत्रिणीने केअरटेकरच्या तोंडात बोळा कोंबला व तिचे हातपाय बांधले. नंतर या बांगलादेशी महिलांनी मुख्य प्रवेशद्वाराचे कुलूप उघडून पळ काढला. या रेस्क्यू फाउंडेशनने सुरक्षेसाठी वारंवार पोलिस संरक्षणाची मागणी केली होती, अशी माहितीही पुढे आली आहे. मात्र, अखेरपर्यंत येथे पुरेसा बंदोबस्त पुरविला गेला नाही. यासाठी जबाबदार असणाऱ्या सर्वांवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

मुंबईच्या धर्तीवर पुणे शहरात वाढत्या अवैध बांगलादेशी नागरिकांच्या वास्तव्यावर तातडीने व्यापक कोम्बिंग ऑपरेशन राबविण्याची मागणी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. शहरात तब्बल 50 हजारांपर्यंत बांगलादेशी घुसखोर असल्याचा अंदाजही मिसाळ यांनी वर्तविला आहे. मुख्यमंत्री फडणवीसांसह राज्याच्या पोलिस महानिरीक्षकांना दिलेल्या निवेदनात मिसाळ यांनी म्हटले आहे की, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशींचे अवैध स्थलांतर वाढत आहे. निवडणुकांनंतर मोठ्या प्रमाणावर हे नागरिक महाराष्ट्रात, विशेषतः पुण्यात येतात. 2023 मधील राज्य गुप्तचर विभागाच्या अहवालानुसार, पुण्यात 5 हजार बांगलादेशी नागरिक वास्तव्यास होते.

मात्र, मागील तीन वर्षांत केवळ 5 जणांचीच हकालपट्टी करण्यात आली आहे. हे घुसखोर बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्रांच्या आधारे शहरात वास्तव्य करीत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे लक्ष्मी रोड, फर्ग्युसन रोडसारख्या गर्दीच्या भागात महिला सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. आर्थिक फायद्यासाठी अशा घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांची सखोल चौकशी करण्याची मागणीही मिसाळ यांनी केली आहे. दरम्यान, शहरातील झोपडपट्ट्या, बांधकाम साइट्स आणि दाट वस्त्यांमध्ये तातडीने कोम्बिंग ऑपरेशन राबविणे, बनावट कागदपत्रांच्या साखळीचा छडा लावण्यासाठी एटीएस आणि एनआयए यांचे संयुक्त पथक नेमण्यात यावे तसेच अटक करण्यात आलेल्या घुसखोरांची त्वरित हद्दपारी करण्याची मागणी मिसाळ यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेईई मेन्सच्या दुसऱ्या सत्राचा निकाल 20 एप्रिलपर्यंत, परीक्षेची तात्पुरती उत्तरसूची जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : जेईई मेन्सच्या दुसऱ्या सत्रातील परीक्षेची तात्पुरती उत्तरसूची जाहीर केली आहे. एनटीएच्या अधिकृत वेबसाईटला भेट देऊन विद्यार्थ्यांना उत्तरसूची डाऊनलोड करता येणार असून, सोमवारी (दि. 13) रात्री 11.50 पर्यंत आक्षेप नोंदविता येणार आहे. संबंधित परीक्षेचा निकाल 20 एप्रिलपर्यंत लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. एनटीएने देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर 2 एप्रिल ते 8 एप्रिल यादरम्यान जेईई मेन्स सत्र 2 परीक्षा घेतली होती. त्याची उत्तरतालिका आता प्रसिद्ध झाली आहे. उत्तरतालिका डाऊनलोड करण्यासाठी उमेदवारांना त्यांचा अर्ज क्रमांक आणि पासवर्ड टाकावा लागेल. एनटीएच्या अधिकृत अधिसूचनेनुसार, आक्षेप नोंदविण्याची विंडो सुरू केली आहे. उमेदवार 13 एप्रिल रात्री 11.50 पर्यंत अधिकृत वेबसाईटला भेट देऊन आपले आक्षेप नोंदवू शकतात. सर्व उमेदवारांना अंतिम मुदतीपूर्वी आक्षेप नोंदविण्याचा सल्ला देण्यात येत आहे. त्यानंतर उमेदवारांना दुसरी संधी दिली जाणार नाही. आक्षेप नोंदविण्यासाठी उमेदवारांना प्रत्येक प्रश्नासाठी 200 रुपये आक्षेप शुल्कही भरावे लागेल तसेच सर्व उमेदवारांना निकाल डाऊनलोड करण्यासाठी वेळोवेळी अधिकृत वेबसाईटला भेट देत राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



### पुण्यात हापूस आंबा महागच; अक्षय्य तृतीयेलाही दर कमी नाहीत

पुणे (दैनिक संध्या) : फळांचा राजा असलेल्या हापूस आंब्यांची गुलटेकडी मार्केट यार्डात आवक वाढू लागली आहे. मात्र दर अजूनही सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे झालेले नाहीत. उलट, यंदा अक्षय्य तृतीयेलाही आंबा महागच राहणार असल्याचे चित्र आहे. सध्या बाजारात 800 ते 1500 रुपये डझन या दराने आंबा उपलब्ध आहे. दरवर्षी अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर बाजारात आंब्याची मोठी आवक होऊन दर खाली येतात. मात्र, यंदा लहरी हवामानामुळे आंब्याच्या उत्पादनावर विपरित परिणाम होऊन अपेक्षित आवक होताना दिसत नाही. त्यामुळे, घाऊकसह किरकोळ बाजारात आंब्याचे दर चढेच आहेत. कोकणपट्ट्यातून पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळबाजारात दररोज जवळपास दहा हजार पेट्या, तर कर्नाटकातून दोन ते अडीच हजार पेट्यांमधून आंबा दाखल होत आहे. अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर आवक वाढली आहे. रविवारपर्यंत आंबा तयार होईल. मात्र, सध्याचे दर खूपच जास्त आहेत. त्यामुळे, आंबा खरेदी करताना ग्राहक हात आखडता घेत आहे. एरवी एका पेटीची खरेदी करणारे नागरिक एक ते दोन डझन खरेदी करीत आहे. अक्षय्य तृतीयेनंतर आंब्याचे दर खाली येण्याची शक्यता आहे.



### पुण्यात उष्णतेची लाट; पारा 41 अंशांवर

पुणे (दैनिक संध्या) : शहरात उष्णतेची लाट दोन दिवसांपासून सक्रिय झाली आहे. रविवारी पारा 41 अंशांवर गेल्याने पुणेकर उकाड्याने हैराण झाले होते. भरदुपारी प्रमुख रस्त्यांवरची वर्दळ कमी झाल्याचे दिसून आले. 39 ते 40 अंशांवर पोहोचले आहे. त्यामुळे दुपारी 12 ते सायंकाळी 6 पर्यंत उष्ण लहरी सक्रिय झाल्याने पुणेकरांचा रविवार कुलरसमोरच गेला. सायंकाळी देखील खूप उकाडा जाणवत असल्याने नागरिक घराबाहेर पडले. उद्यानात गर्दी झालेली दिसत होती. रविवारचे शहराचे तापमान : शिवाजीनगर 39, पाषाण 38, लोहगाव 41, चिंचवड 39, लवळे 39, मगरपट्टा 39, एनडीए 38, कोरेगाव पार्क 39.



### पुण्यात मासळीचे दर तेजीत; चिकन स्वस्त, अंड्यांचे दर वाढले

पुणे (दैनिक संध्या) : देशाच्या पूर्व किनारपट्टीवर मासेमारीबंदी लागू झाल्याने होड्या किनाऱ्यावर परतल्या आहेत. सद्यःस्थितीत पश्चिम किनारपट्टीवरून बाजारात मासळी दाखल होत आहे. बाजारातील मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याने मासळीचे तेजीतील दर टिकून आहेत. चिकन आणि इंग्लिश अंडीचा मागणी आणि पुरवठा पूर्वपदावर आला आहे. परिणामी, चिकनच्या वाढलेल्या भावात किलोमागे वीस रुपयांनी घसरण झाली आहे. तर, इंग्लिश अंडीच्या घसरलेल्या भावात शेकड्यामागे तीस ते चाळीस रुपयांनी वाढ झाली आहे. गावरान अंडी आणि मटणाचे भाव स्थिर राहिले. रविवारी बाजारात (दि. 12) खोल समुद्रातील मासळी 10 ते 15 टन, खाडीच्या मासळीची सुमारे 150 ते 200 किलो आणि नदीच्या मासळीची 500 ते 600 किलो इतकी आवक झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाराष्ट्र सागरी मंडळाचे वहुर जेट्टीचे काम निकृष्ट दर्जाचे

महाड (दैनिक संध्या) : महाराष्ट्र सागरी महामंडळाकडून महाड तालुक्यातील सव येथे गरम पाण्याचे कुंड आहे या ठिकाणी जाण्यासाठी सावित्री नदीच्या पाण्यातून होडीतून जावे लागत असल्याने पर्यटकांसाठी जे टी बांधण्याचे काम करण्यात आले मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तब्बल अडीच कोटी रुपये सावित्री नदीच्या पाण्यात वाहून जाणार असल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की महाड तालुक्यातील सव येथे गरम पाण्याचे कुंड आहे त्या ठिकाणी राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात मात्र या ठिकाणी जाण्यासाठी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वहूर येथून बोटीतून जाणे सोयीस्कर असल्याने अनेक पर्यटक बोटीतून जाणे पसंत करतात मात्र पूर्वीची जेटी नादुरुस्त झाल्याने त्या ठिकाणी नवीन जेट्टीचे काम महाराष्ट्र सागरी मंडळाकडून मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र सागरी मंडळ मुंबई यांच्याकडून रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील एस .जे.कन्स्ट्रक्शन कंपनीला0. 75 टक्के कमी दराने 2, 42,77,122 लक्ष रुपयांचे काम या कंपनीला देण्यात आले त्याचा दोष दायित्व कालावधी 36. महिन्याचा आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाकडून वहूर येथील जेटीचे काम करताना ठेकेदाराने वाळू ऐवजी ग्रिट चा वापर तर केलाच आहे मात्र नवीन जेटीचे चे काम न करता जुन्याजेटीला सहा इंचाची काँक्रीट ची कव्हरिंग करून सदरचे काम नवीन केल्याचे दाखविले आहे.महाराष्ट्र सागरी मंडळाकडून वहूर येथील जेटीचे काम चालू असताना महाराष्ट्र सागरी मंडळाचा एकही शाखा अभियंता तसेच उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यापैकी एकही अधिकारी काम चालू असताना प्रत्यक्ष जागेवर हजर नव्हता त्यामुळे ठेकेदाराने मनमानी पद्धतीने वाळू ऐवजी ग्रिट वापरून हे काम घाईघाईत पूर्ण केले आहे.

### रोड डिव्हायडरवरील मोबाईल टॉवर्सना उलवेकरांचा विरोध; आंदोलन सुरु

उरण (दैनिक संध्या) : उलवे येथील रहिवासी आणि नागरिक संघटनांनी रस्त्यांच्या डिव्हायडरवर मोबाईल टॉवर उभारण्याच्या कामाविरोधात आंदोलन सुरू केले आहे. या संरचनांमुळे सार्वजनिक सुरक्षा, वाहतूक व्यवस्था आणि आरोग्यास गंभीर धोका निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कार्यकर्त्यांनी सांगितले की, उलवेमध्ये जवळपास 20 ठिकाणी रोड डिव्हायडर खोदण्यात आले आहेत. तसेच द्रोणागिरी, कांजाडे, पुष्पक नगर, उरण आणि टारघर येथेही अशाच प्रकारची कामे प्रस्तावित आहेत. स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, व्यापक जनसल्लामसलत किंवा स्पष्ट सुरक्षा परवानग्या न घेता सार्वजनिक डिव्हायडरचा दूरसंचार पायाभूत सुविधांसाठी वापर का केला जात आहे, असा सवाल करण्यात आला आहे. मानवी हक्क कार्यकर्ते बी. एन. कुमार, 'ह्युमन चेन ऑनलाइन' चे संयोजक यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि रायगड जिल्हाधिकारी कार्यालय यांना तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. 'डिव्हायडरवर स्ट्रीटलाइट्स समजू शकतात, पण मोबाईल टॉवरांची रांग मान्य होऊ शकत नाही. अधिक सुरक्षित आणि योग्य जागा शोधल्या पाहिजेत,' असे कुमार म्हणाले. रहिवाशांनी निवासी भाग, शाळा आणि गर्दीच्या सार्वजनिक रस्त्यांच्या जवळ उभारण्यात येणाऱ्या टॉवरमधून होणाऱ्या किरणोत्सर्गाच्या दीर्घकालीन आरोग्य परिणामांवर स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास करण्याची मागणी केली आहे. तज्ज्ञांच्या मते, टॉवर किरणोत्सर्गाबाबत जनतेची चिंता प्रामुख्याने दीर्घकालीन संपर्कावर केंद्रित असते, तर नियामक संस्था दूरसंचार उत्सर्जन निश्चित मर्यादेत असल्याचे सांगतात. नागरिकांनी अधिकृत माहिती, रेडिएशन ऑडिट आणि अनुपालन प्रमाणपत्रे सार्वजनिक करावीत, अशी मागणी केली.

# सिडको उभारणार खारघर कोस्टल रोड

**कळंबोली (दै. संध्या) :**

नवी मुंबई विमानतळापर्यंतचा प्रवास सोपा आणि वाहतूककोंडीमुक्त करण्यासाठी शहरात दोन कोस्टल रोड उभारले जाणार आहेत. यापैकी एक म्हणजे खारघर सागरी किनारा मार्ग किंवा कोस्टल रोड. सिडकोच्या या महत्त्वकांक्षी प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ 45 मिनिटांवरून थेट 10 मिनिटांवर येणार आहे. तसेच, भविष्यात नवी मुंबई विमानतळापर्यंत हाय-स्पीड कनेकटीव्हीटी निर्माण होण्यास मदत होणार आहे.

खारघरच्या सेक्टर 16मधील जलमार्गापासून हा कोस्टल रोड सुरू होणार आहे. पनवेल खाडीवरून खारघर स्थानकाजवळील पे हाऊसिंग स्कीमच्या बाजूने सीबीडी बेलापूरमधील सेक्टर 15पर्यंत हा मार्ग जातो. त्यापुढे डीपीएस नेरुळ परिसरात संपतो. कोस्टल रोडमुळे खारफुटी आणि खाडीवर कमीत-कमी परिणाम होण्यासाठी या मार्गाचा काही भाग जमिनीच्या दिशेने वळवण्यात आला आहे.



खारघर कोस्टल रोडमुळे मुंबई महानगर प्रदेशातील महत्त्वाच्या मार्गांना नवी मुंबई शहर आणि विमानतळाशी जोडणी मिळणार आहे. शीव पनवेल मार्गावर कोस्टल रोड गृहनिर्माण प्रकल्प आणि कॉर्पोरेट पार्कला ही जोडणार आहे. तसेच, खारघरमध्ये नवीन बनत असलेल्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कशीही थेट जोडणी मिळणार आहे.

नेरूळजवळ या मार्गाला पाम बीच रोडशीही थेट जोडणी मिळणार आहे. खारघर कोस्टल रोडमुळे खारघर, सीबीडी बेलापूर आणि नेरुळदरम्यान प्रवासाचा वेळही कमी होणार आहे. सिडकोकडून या प्रकल्पाचं काम सुरू असून 2028पर्यंत हा मार्ग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. हा मार्ग सहा पदरी असून भविष्यात कोस्टल रोडला अटल सेतूशी जोडण्याचीही शक्यता आहे.

खारघर कोस्टल रोडसाठी तब्बल 1020.70 कोटींचा खर्च अपेक्षित आहे. हा मार्ग 9.678 किमी लांब असून पनवेलच्या खाडीवरून खारघर, सीबीडी बेलापूर आणि नेरूळपर्यंत जोडणार आहे.

या मार्गाचं बांधकाम सध्या दोन टप्प्यात सुरू आहे. पहिल्या टप्प्यात खारघर ते सीबीडी बेलापूर मार्ग तयार करण्यात येणार असून पुढील टप्प्यात सीबीडी बेलापूर ते नेरूळ जेट्टीपर्यंत रस्ता बांधण्यात येईल. दरम्यान, विमानतळासह हा मार्ग शीव-पनवेल महामार्गाशीही जोडला गेला असेल. त्यामुळे मुंबईतील पूर्व उपनगरं थेट विमानतळापर्यंत जोडली जातील.

## उन्हाचा वाढला तडाखा, पारा ४० अंशांपार

**छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या) :**

अवकाळीच्या शिडकाव्यानंतर शहराचा पारा पुन्हा एकदा वाढत आहे. शनिवारी शहराचे कमाल तापमान ३९.४ अंशांपर्यंत वाढले, तर रविवारी शहराचे तापमान चाळीशीपार होऊन ४०.६ अंश सेल्सिअसच्या उच्चांकावर पोहोचले. यंदाच्या मौसमातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. उष्णतेच्या लाटांमुळे दिवसभर असह्य चटके आणि झळा बसत होत्या.

एक एप्रिल रोजी शहराचा पारा ३८.० अंश सेल्सिअसवर कायम असल्याने तापमान लवकरच चाळीशीपर्यंत जाण्याची शक्यता वर्तविली होती. तीन दिवसांपूर्वी गुरुवारी शहराचे कमाल तापमान ३५.६ अंश सेल्सिअसवर होते. शुक्रवारी कमाल तापमान ३७.९ अंशांपर्यंत वाढले. तर शनिवारी ३९.४ अंश सेल्सिअस होते.

रविवारी पारा चाळीशीपार करून ४०.४ च्या उच्चाकांवर पोहोचला. मौसमातील हा सर्वाधिक उष्ण दिवस ठरला. त्यामुळे शहरवासीयांना दिवसभर उन्हाचे चटके बसत होते. किमान तापमानही २३.८ अंशांवर गेल्याने उकाड्यानेही शहरवासीयांना हैराण केले. दरम्यान, पुढील काही दिवस असेच उष्ण वातावरण राहणार असल्याचे हवामान तज्ज्ञांनी सांगितले.

## चौदा गावांचे दप्तर महापालिका घेणार ताब्यात; प्रक्रिया सुरू

**नवी मुंबई (दै. संध्या) :**

नवी मुंबई महापालिकेत समावेश झाल्यानंतरही दुर्लक्षीत राहिलेल्या त्या 14 गावांपैकी पाच ग्रामपंचायतीचे दफ्तर ताब्यात घेण्यास नवी मुंबई महापालिकेने सुरुवात केली आहे. महापालिकेतील प्रत्येक विभागाने या गावांतील ग्रामसेवकांकडे माहिती मागवली आहे. मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ही माहिती संकलित केली जाणार आहे.

यासाठी परिमंडळ तीन नव्याने तयार केले असून त्यामध्ये निघू, मोकाशीपाडा, नावाळी, भंडार्ली, पिंपरी गाव, गोटेघर, बंबार्ली, उत्तरशिव, नागाव, नारीवली, वाकळण, बाळे आणि दहीसर



मोरी आदी चौदा गावांचा समावेश केला आहे. त्याची जबाबदारी महापालिका उपायुक्त संजय शिंदे यांच्याकडे सोपवली आहे.

या 14 गावांच्या समावेशाला वनमंत्री गणेश नाईक यांनी सुरुवातीपासून विरोध आहे. मात्र या विरोधाला झुगारुन शिवसेनेचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 14 गावांचा समावेश नवी मुंबई महापालिकेत करण्याचा निर्णय घेतला आणि अध्यादेशही काढला. त्यानंतर राजकीय वातावरण तापले. मात्र त्याचा फारसा परिणाम झाला नाही. आता या 14 गावांचे दफ्तर 31 मार्चपर्यंत ताब्यात घेण्यासाठी झेडपी मुख्य कार्यकारी अधिकारी, महापौर, उपमहापौर यांनी पत्रव्यवहार केला आहे.

याबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व विभागातील समन्वय अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी यांची परिमंडळ 3 उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत 27 मार्च रोजी एक बैठक घेतली. या बैठकीत अपेक्षित असलेल्या माहितीचा तक्ता या ग्रामसेवकांना देण्यात आला आहे. त्यामध्ये माहिती संकलित करुन देण्याचे सांगण्यात आले. 14 अधिकारी, कर्मचारी या कामासाठी महापालिकेने नियुक्त केले आहेत. यावेळी विद्युत, पाणी पुरवठा, शाळा, आरोग्य केंद्र, मालमत्ता, शिक्षण, घनकचरा, नगररचना, अतिक्रमण आणि सामान्य प्रशासन विभागाची माहिती या गावातील ग्रामसेवकांकडून मागवली आहे.

# एसटी प्रवाशांकडून वसूल करणार स्वच्छता कर

## स्वच्छतेच्या नावाने बोंबाबोंब : तरीही प्रवाशांवर आर्थिक भार

**छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या) :**

एसटी महामंडळाने प्रवाशांना बससह बसस्थानक, तेथील स्वच्छतागृह, प्रतीक्षालयांत स्वच्छता उपलब्ध करून देण्यास १५ एप्रिलपासून प्रवाशांकडून स्वच्छता कर वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता प्रवाशांना प्रत्येक तिकिटामागे २ रुपये जादा मोजावे लागणार आहेत. बसस्थानक, स्वच्छतागृहे तसेच बसच्या स्वच्छतेबाबत बोंबाबोंब असताना स्वच्छता कर मात्र वसूल करण्यात येत असल्याने प्रवाशांत नाराजीचा सूर आहे.

राज्यात एसटीची १५१ आगार व ५९८ बसस्थानके आहेत. याची स्वच्छता कंत्राटी कामगारांकडून करवून घेण्यात येत आहे. दरम्यान, स्वच्छतेबाबत तक्रारी वाढल्याने



आता स्वच्छतेचे काम कराच्या माध्यमांतून मिळालेल्या पैशांतून दर्जेदार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने १४ एप्रिलच्या मध्यरात्री पासून मासिक, त्रैमासिक पास धारक व सर्वसामांन्य प्रवाशांकडून प्रत्येक तिकिटांसाठी २ रुपये स्वच्छता कर वसूल करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र दर्शनसाठी ५ रुपये तर विशेष कामांसाठी बस घेणाऱ्यांना एका बससाठी प्रत्येक दिवस ५० रुपये आकारण्याचे आदेश देण्यात आले आहे. राज्यात दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात.

शिवशाही असो की इतर बस असो त्यात अस्वच्छता मोठ्या प्रमाणात असते. आरामदाई शिवशाहीत तर मुंग्या आणि झुरळाचा प्रवास असतोच यात सुधारणा करण्याच्या नावाखाली स्वच्छता कराचा बोजा प्रवाशांवर टाकण्यात येत असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्वच्छता करातून विद्यार्थी, अहिल्याबाई होळकर पास, १४ एप्रिलच्या आगोदर तिकीट बुक करणाऱ्यांना, तसेच मानव विकासचे विद्यार्थी यांना स्वच्छता कर वसूल करण्यातून सवलत मिळणार आहे.

बस प्लॅटफॉर्मवर लागण्यापूर्वी आतून बाहेरून स्वच्छत असावी, एसटी बसमधील चार्जिंग पॉइंट व इतर सुविधा या नियमित तपासल्या जाव्यात असा दंडक आहे. असे असतानाही शिवशाही असो की इतर बस असो त्यात अस्वच्छता मोठ्या प्रमाणात असते. आरामदाई शिवशाहीत तर मुंग्या आणि झुरळाचा प्रवास असतोच यात सुधारणा करण्याच्या नावाखाली स्वच्छता कराचा बोजा प्रवाशांवर टाकण्यात येत असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## जिल्हा बँक संचालकांची मुदत संपली; पण ना मुदतवाढ, ना प्रशासक

**नांदेड (दै. संध्या) :**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत गेल्या आठवड्यामध्ये संपली. तत्पूर्वी या मंडळाची पंचवार्षिक निवडणूक घेण्यासाठी सहकार विभागाने मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली असली, तरी विद्यमान संचालक मंडळास ना मुदतवाढ ना प्रशासक अशी बँकेची सद्यस्थिती आहे.

बँकेचे विद्यमान संचालक मंडळ 4 एप्रिल 2021 रोजी कार्यरत झाले होते. या मंडळाचा कार्यकाळ 3 एप्रिल 2026 रोजी संपुष्टात आला तेव्हा बँकेवर प्रशासक किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासक मंडळ नियुक्त केले जाईल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता; पण याबाबत शासनाने अद्याप कुठलाही निर्णय घेतला नसल्याचे मंत्रालयातून सांगण्यात आले.

या संचालक मंडळाची मुदत एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात संपणार आहे, हे लक्षात घेऊन भाजपाच्या एका नेत्याने मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना गेल्या महिन्यात एक पत्र दिले. त्यात पुढील कालावधीकरिता बँकेवर प्रशासक मंडळ नेमण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी ही विनंती मान्य केली; पण संचालक मंडळाची मुदत संपून एक आठवडा लोटला, तरी मंत्रालयातल्या सहकार विभागाकडून कोणताही आदेश निघालेला नाही किंवा विभागीय सह निबंधक कार्यालयाकडे त्याबाबत कोणतीही सूचना आलेली नाही, असे सांगण्यात आले.

संचालक मंडळाची मुदत संपण्याच्या काही दिवस आधी वरील कार्यालयाने या बँकेच्या मतदारांची यादी तयार करण्याची विहित प्रक्रिया सुरू केली.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या., मुळशी विभागातर्फे आमंत्रित करण्यात येते की, म.रा.वि.वि.क. मर्या., च्या मुळशी विभागीय कार्यालयाअंतर्गत असणाऱ्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांच्या तसेच ट्रान्सफॉर्मरच्या 'बिघाडपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी एजन्सी नामिकाप्रविष्ठ (Empanellment) करण्याकरीता ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. ई– निविदा क्र. टी– ०९/२०२६–२७ ते टी– ०११/ २०२६–२७ असून सदर निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि. १४.०४.२०२६ ते दि. २०.०४.२०२६ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारीख दि.२०.०४.२०२६ ला सकाळी ११:०० वा पर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत कोणताही बदल यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केला जाईल.

अधिक माहितीसाठी संपर्क : ७८७५७६७७०१

**(पीआरओ/ पुणे झेड : ०१५/२०२६–२७)**

**कार्यकारी अभियंता, महावितरण, मुळशी विभाग.**


## मोफत पाठ्यपुस्तके, गणवेशापासून विद्यार्थी वंचित

**कोल्हापूर (दै. संध्या) :**

केंद्र शासनाकडून कोणताही स्पष्ट निर्णय न झाल्याने समग्र शिक्षा अभियान सध्या ठप्प झाले आहे. मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या विविध योजना अडचणीत आल्याने शैक्षणिक क्षेत्रात संभ्रमाचे वातावरण आहे. योजना बंदचा थेट फटका जिल्ह्यातील लाखो विद्यार्थ्यांना बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. समग्र शिक्षा अभियान केंद्र सरकारने 2002 मध्ये सुरू केले. समग्र शिक्षाअंतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश देण्यासह शाळांची गुणवत्ता वाढवणे, शिक्षक प्रशिक्षण, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी योजना राबवणे, शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षण प्रवाहात आणणे अशा अनेक महत्त्वाच्या उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते. गेली अनेक वर्षे हे अभियान प्रभावीपणे सुरू होते; परंतु अभियानाची 31 मार्च रोजी मुदत संपली आहे. अभियान ठप्प झाल्याने या सर्व शैक्षणिक कामांवर परिणाम झाला आहे. 2 एप्रिलपर्यंत शासनाकडून निर्णय अपेक्षित असतानाही कोणतीही स्पष्टता न आल्याने विद्यार्थ्यांच्या योजनांवर संकट ओढावले आहे. आगामी शैक्षणिक वर्षाच्या तयारीवरही परिणाम होत आहे. राज्य शासनाने अभियान सुरू करून कर्मचाऱ्यांची तत्काळ नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.


**MAHATRANSCO** — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice (2nd Call)**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractor's on Mahatransco SRM e-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr.No. | Matter to be displayed on website (English) | Start Date & Time of tender (DD/MM/YYYY HH:MM) (Time with AM/PM) | Last Date & Time of Submission (DD/MM/YYYY HH:MM) (Time with AM/PM) |
|---|---|---|---|
| 1 | Annual civil maintenance of substations under jurisdiction of EHV CCCM Sub division-I, Pune (RFx No. 7000039598) | 14/04/2026 (16:00 PM) | 24/04/2026 (16:00 PM) |
| 2 | Annual civil maintenance of staff quarters/colony buildings under jurisdiction of EHV CCCM Sub division-Pimpari Chinchwad, Pune (RFx No. 7000039597) | 14/04/2026 (16:00 PM) | 24/04/2026 (16:00 PM) |

For futher details please visit to **https://srmetender.mahatransco.in**
**Tender copy per tender 590/-**
**Contact Person:** The Addl. Executive Engineer (C), Tel. No.8010653137

**Sd/-**
**Executive Engineer (C)**
**EHV CCCM Division, Pune**
**MSETCL, Pune - 411011.**


## तीव्र कुपोषित बालकांची संख्या आता ५४ वर; कुपोषण आटोक्यात

**ठाणे (दै. संध्या) :**

दुर्गम डोंगर-दऱ्या, आदिवासी पाडे आणि मर्यादित संसाधनांच्या पार्श्वभूमीवर कुपोषणाची समस्या दीर्घकाळ भेडसावत असलेल्या ठाणे जिल्ह्यात आता दिलासादायक बदल दिसू लागला आहे. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील तीव्र कुपोषित बालकांची संख्या लक्षणीयरीत्या घटली असून कुपोषण आटोक्यात आणण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना यश येत असल्याचा दावा ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने केला आहे.

सन 2023 मध्ये 148 असलेली तीव्र कुपोषित बालकांची संख्या आता 54 वर आली आहे. विशेषतः शहापूर, मुरबाड आणि भिवंडी तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागात ही समस्या अधिक गंभीर होती. अपुरी पोषणमूल्ये, आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचण्यातील अडचणी, आर्थिक मर्यादा आणि जागरूकतेचा अभाव ही कुपोषणामागील प्रमुख कारणे होती.

## नवी मुंबई विमानतळामुळे बदलतेय अर्थकारणाची दिशा

**नवी मुंबई (दै. संध्या) :**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानसेवेचा वेगाने विस्तार होत आहे. विमान कंपन्यांनीही आपल्या सेवा वाढवल्याने या विमानतळावरून आता दररोज 156 विमानांची उड्डाणे होऊन देशांतर्गत 46 शहरे जोडली जातील. या प्रकल्पांमुळे प्रवासी वाहतुकीसोबत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्याभोवती विकसित होत असलेली तिसरी मुंबईच्या विकासाला अधिक चालना मिळून ठाणे आणि मुंबईच्या अर्थव्यवस्थेची दिशा बदलत रोजगारावर दूरगामी व अतिशय सकारात्मक झालेला परिणाम पाहायला मिळेल.

उन्हाळ्यातील प्रवाशांचा वाढता प्रतिसाद पाहून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने (एनएमआयए) एप्रिल 2026 साठी आपला उन्हाळी उड्डाण आराखडा जाहीर केला असून, त्याअंतर्गत विमानसेवेचा मोठा विस्तार करण्यात आला आहे. 25 डिसेंबर 2025 रोजी व्यावसायिक सेवा सुरू झाल्यानंतर आता एनएमआयए हे विमानतळ देशांतर्गत हवाई कनेक्टिव्हिटीचे एक प्रमुख केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. नव्या आराखड्यानुसार इंडिगोने 23 एप्रिलपर्यंत 30 हून अधिक नवीन मार्गांची भर घातल्याने उड्डाणांची संख्या प्रति आठवडा अंदाजे 1,092 पर्यंत वाढेल, म्हणजेच दररोज सरासरी 156 उड्डाणे होतील. विमानतळ सुरु झाले तेव्हा दररोज 22 उड्डाणे होती, ती वाढून दररोज 78 उड्डाणे होण्याची अपेक्षा आहे.

हे विमानतळ आता देशातील 46 शहरांना जोडले जाणार असून 30 नवीन मार्ग 23 एप्रिलपर्यंत टप्प्याटप्प्याने सुरू होतील. या विस्ताराद्वारे नवी मुंबई आता आग्रा, अयोध्या, बागडोगरा, चंदीगड, कोलकाता, पाटणा, श्रीनगर, वाराणसी, विशाखापट्टणम औरंगाबाद, बरेली, बेळगाव, भावनगर, भोपाळ, चंदीगड, डेहराडून, दीव, गोवा, गोरखपूर, हिंडन, जबलपूर, राजकोट, जम्मू, कन्नूर, कोल्हापूर, मदुराई, रायपूर, तिरुमझा, विरुमपती आणि त्रिगुंधा ही शहरे जोडली जाणार आहेत.

या नवीन विमानसेवेमुळे मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आणि देशातील इतर राज्यांमधील व्यापार, पर्यटन आणि दळणवळणाला मोठी गती मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच देशांतर्गत सेवा स्थिरावल्यामुळे आणि पायाभूत सुविधांचा विस्तार झाल्यामुळे आता 2026 मध्येच आंतरराष्ट्रीय उड्डाणे (उदा. दुबई, सिंगापूर) सुरू करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

नवी मुंबई विमानतळ आणि अटल सेतूमुळे रायगड जिल्ह्यात जागतिक स्तरावरील कनेक्टिव्हिटी निर्माण झाल्याने तिसरी मुंबई आकाराला येत आहे. या नव्या शहराला कर्नाळा-साई-चिरनेर असे नाव देण्यात आले असून, ते रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल आणि पेण या तीन तालुक्यांमधील 323 चौरस किलोमीटर (124 गावे) परिसरात विस्तारलेले असेल.

अलीकडेच राज्य मंत्रिमंडळाने तिसऱ्या मुंबईच्या भूमी धोरणाला (लँड पोलिसी) मंजुरी दिली आहे. तसेच, एमएमआरडीएने आपल्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात या शहराच्या उभारणीसाठी तब्बल 4 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या नव्या शहरामुळे मुंबई आणि नवी मुंबईवरील लोकसंख्येचा ताण कमी होईल. पायाभूत सुविधांचा विकास होऊन जागतिक गुंतवणूक आकर्षित होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पिंपरी-चिंचवडमध्ये नदी प्रदूषणावर कठोर कारवाईचा इशारा

पिंपरी (दैनिक संध्या) : खासगी संस्था व उद्योगांकडून सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट नदीपात्रात सोडले जाते. परिणामी, जल प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. अनेक उद्योगांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारले जातात; मात्र योग्य देखभालीअभावी ते बंद अवस्थेत असतात. यापुढे अशा उद्योगांवर केवळ नोटीस न बजावता थेट व कठोर कारवाई केली जाईल, असे राज्याच्या पर्यावरणमंत्री तथा वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले. आकुर्डी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मुख्यालयात शुक्रवार (दि. 10) आयोजित विशेष बैठकीत त्या बोलत होत्या. तत्पूर्वी, मंत्री मुंडे यांनी तळवडे येथील रॉ वॉटर पंपिंग स्टेशन व इंद्रायणी नदीची सद्यस्थिती, तसेच रावेत येथील पंपिंग स्टेशन व पवना नदीतील प्रदूषणाची पाहणी करून परिस्थितीचे गांभीर्य जाणून घेतले. बैठकीत 'पीएमआरडीए' व पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या वतीने इंद्रायणी, पवना व मुळा-मुठा नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांचे सादरीकरण करण्यात आले. एकवेळ नदी सुशोभित केली नाही तरी चालेल; मात्र ती प्रथम प्रदूषणमुक्त झालीच पाहिजे, अशी भूमिकादेखील त्यांनी या वेळी मांडली. स्थानिक स्वराज्य संस्था तसेच, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांनी नदीपात्रातील अतिक्रमणे तातडीने काढावीत, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी दिल्या. प्रत्येक गृहनिर्माण संस्थेस (सोसायटी) 'एसटीपी' सक्तीचा करावा व आपल्या हद्दीतील प्रत्येक नाला 'एसटीपी'ला जोडून केवळ प्रक्रिया केलेलेच पाणी नदीत जाईल, याची काटेकोर दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. या बैठकीला आमदार उमा खापरे, आमदार शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सहसचिव रमेश मनाले, 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहसंचालक जे. एस. साळुंके, पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता डी. एम. डुबल, एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता नीलेश मोंढवे उपस्थित होते.



### तळेगाव दाभाडेत चाऱ्याची टंचाई; शेतकऱ्यांची कसरत वाढली

तळेगाव दाभाडे (दैनिक संध्या) : तळेगाव दाभाडे परिसरात सध्या कडक उन्ह पडत असल्यामुळे डोंगर, माळरानावरील चारा वाळून गेला आहे. पाऊस पडायला किमान दोन ते अडीच महिने असल्याने शेतकऱ्यांना चारा सुरक्षित ठेवताना कसरत करावी लागत आहे. तसेच, चारा अपुरा पडू नये, यासाठी कडवाळ (घास) लावताना शेतकरी दिसत आहेत. ज्यांच्याकडे जनावरे आहेत ते शेतकरी जनावरांना चारा अपुरा पडू नये, यासाठी चारा सुरक्षित ठेवत आहेत. तसेच, त्याची निगा राखताना दिसत आहेत. वेळप्रसंगी कडबा, उसाचे वाढे आदी विकत घेत आहेत. परिसरात यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले असल्यामुळे जनावरांची संख्या कमी झाली आहे. तरी अनेकजण शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गाय, म्हैस, शेळ्या पाळत आहेत. तसेच, ज्यांना जमीन कमी आहे त्यांना यांत्रीकीकरण परवडत नसल्यामुळे ते शेतीच्या कामासाठी जनावरे पाळतात. त्यामुळे पाऊस पडेपर्यंत चारा कमी पडू नये, यासाठी शेतकरी चारा सुरक्षित ठेवताना दिसत आहेत. अवकाळी पावसाने चारा भिजू नये, यासाठी प्लास्टिकच्या कागदाने अथवा ताडपत्रीने आवरण घालून चारा झाकला जात आहे. अनेकवेळा जनावरांना काही काम नसले तरी बळीराजा त्यांना उपाशी ठेवत नाही. ज्यांच्याकडे शेळ्या आहेत त्यांना अधिक कसरत करावी लागत आहे. शेळ्यांना इतर जनावरांसारखा कडबा चालत नाही. त्यांना झाडपाला द्यावा लागतो. यासाठी शेतकऱ्यांना वणवण फिरावे लागत आहे. तसेच, चारा सांभाळून ठेवताना त्यास आग लागू नये, याबाबत काळजी घ्यावी लागते. पाण्याची कमतरता असली तरी इतर उत्पन्न न घेता अनेक शेतकरी शेतात कडवाळ लावत आहेत.



### पिंपरीमध्ये बीआरटी मार्ग धोकादायक; तुटलेले दुभाजक, राडारोड्यामुळे अपघातांचा धोका

पिंपरी (दैनिक संध्या) : भोसरी-पिंपळे सौदागर-हिंजवडी आयटी हबला जोडणारा शहरातील प्रमुख बीआरटी मार्ग समस्यांच्या विळख्यात सापडला आहे. याबाबत प्रशासनाकडून केवळ दुरुस्तीचे आश्वासन दिले जात आहे; परंतु कार्यवाही होत नाही. रस्ता दुभाजक तुटल्याने तेथील राडारोडा न उचलल्याने वाहनांना अपघात घडत आहेत. एखाद्याचा जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतापजनक प्रश्न नागरिक करत आहेत. या मार्गावरील पिंके चौक, कोकणे चौक, शिवार गार्डन चौक, काटे पाटील चौक या चौकामध्ये बीआरटी मार्गावरील रस्ता दुभाजक अनेक ठिकाणी वाहनांच्या धडकेमुळे पूर्णपणे तुटलेले आहेत. विशेष म्हणजे, या तुटलेल्या दुभाजकाचे अवशेष तुटून काही महिने उलटले तरी अजूनही रस्त्यावरच पडून आहेत. कॉँक्रीटचे तुकडे, उघड्या लोखंडी सळ्या आणि ढिगाऱ्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी तर ही परिस्थिती अधिकच गंभीर बनते, कारण अपुरी प्रकाशयोजना आणि अव्यवस्थित रस्त्यामुळे वाहनचालकांना अपघात घडत आहेत. दररोज हजारो आयटी कर्मचारी, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक या मार्गाचा वापर करतात. मात्र, सध्याच्या परिस्थितीत या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे. अपघात होण्याची शक्यता सतत निर्माण होत असून, कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या समस्यांकडे वृत्तपत्रातून वारंवार लक्ष वेधण्यात आले आहे. परंतु, संबंधित विभागाकडून केवळ आश्वासने देण्यापलीकडे कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

# पिंपरी-चिंचवडमध्ये देहविक्रयाविरोधात कडक मोहीम

## रस्त्यावर अश्लील वर्तन करणाऱ्यांवर कारवाई; नागरिकांचा पाठिंबा, पुनर्वसनाचा मुद्दा कायम

**पिंपरी (दै. संध्या)**

रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना अश्लील इशारे करत 'शुक-शुक' आवाज देत देहविक्रय करणाऱ्या महिलांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कडक मोहीम हाती घेतली आहे. शहरातील विविध भागांमध्ये दररोज दोन ते तीन महिलांवर कारवाई केली जात असून, या कारवाईचे नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात समर्थन होत आहे.

शहरातील मुख्य रस्ते, चौक, बसथांबे आणि आयटी पार्क परिसरात काही महिला उभ्या राहून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना हातवारे, इशारे करून आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. या प्रकारामुळे महिला, कॉलेजच्या मुली तसेच लहान मुलांसमोरही विचित्र परिस्थिती निर्माण होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे सातत्याने येत होत्या. तसेच अशा प्रकारांमुळे वाहतूक व्यवस्थेलाही अडथळा निर्माण होत असल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले होते.



या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या आदेशाने विशेष पथके तयार करून अशा महिलांवर लक्ष ठेवत कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच, स्थानिक पोलिसांनाही कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पोलिसांच्या या कारवाईला सामाजिक स्तरावरही पाठिंबा मिळत आहे. रस्त्यावर उघडपणे होणारे असे प्रकार समाजातील नैतिक वातावरणावर परिणाम करणारे ठरतात. पोलिसांनी घेतलेली भूमिका योग्य असून, अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. मात्र, या महिलांचे समुपदेशन आणि पुनर्वसनही तितकेच महत्त्वाचे आहे, असे मत सामाजिक संघटनांकडून व्यक्त होत आहे.

या महिलांवर नव्या भारतीय न्याय संहिता अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन, सार्वजनिक त्रास आणि शिस्तभंग यांसारख्या कलमांनुसार कारवाई केली जाते. अशा प्रकरणांमध्ये दंड किंवा अल्पकालीन कारावासाची तरतूद आहे. बहुतांश गुन्हे जामीनपात्र असल्याने संबंधित महिलांना तात्पुरत्या स्वरूपात जामीन मिळतो. मात्र, वारंवार गुन्हा आढळल्यास न्यायालयाकडून अधिक कठोर भूमिका घेतली जाऊ शकते.

# सांगवी फाटा मृत्यूचा सापळा; नागरिकांचा पादचारी पूल व सुरक्षिततेसाठी आक्रोश

**पिंपळे गुरव (दै. संध्या)**

शहरातील रस्त्यांवर महापालिकेच्या वतीने सुशोभीकरण करण्यात येत आहे. परंतु नागरिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यात येत नाहीत. शहराच्या सुशोभीकरणापेक्षा आमचा जीव वाचवा, अशी आर्त हाक सांगवीतील नागरिकांनी दिली आहे. औंध-रावेत सहा पदरी बीआरटी मार्ग सध्या वाहतुकीसाठी नव्हे तर अपघातांसाठी ओळखला जात आहे. पादचाऱ्यांसाठी हा रस्ता जीवघेणा बनला आहे. यामुळे या मार्गावर पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

नुकताच 20 वर्षीय विद्यार्थी सोहम दीपक व्यास याचा रस्ता ओलांडताना झालेला मृत्यू हा केवळ अपघात नसून, प्रशासकीय निष्काळजीपणाचे उदाहरण असल्याची संतप्त भावना नागरिक व्यक्त करत आहेत. वारंवार अपघात घडूनही ठोस उपाययोजना न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



विशेष म्हणजे सांगवी-बोपोडी दरम्यान उभारण्यात आलेल्या पुलासाठी सुमारे 40 ते 50 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. मात्र, ज्या सांगवी फाट्यावर दररोज हजारो नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागतो. त्या ठिकाणी पादचारी पूल किंवा सुरक्षित भुयारी मार्गाची कोणतीही सोय उपलब्ध नाही.

याच ठिकाणी उड्डाणपुलाखाली पालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपये खर्चून ओपन जिम, वॉकिंग ट्रॅक, बॅडमिंटन टेबल टेनिस, विरंगुळा केंद्र तसेच योगा शेड अशा सुविधा उभारण्यात आल्या आहेत. मात्र, या सौंदर्यीकरणाच्या प्रकल्पांच्या आड मूलभूत सुरक्षेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याची तीव टीका नागरिकांकडून होत आहे. दिसण्यासाठी विकास पण माणसांच्या जीवाची किंमत नाही का? असा संतप्त सवाल आता सर्रास विचारला जात आहे.

सांगवी, दापोडी, पिंपळे गुरव तसेच पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या हजारो नागरिकांची या मार्गावर दररोज मोठी वर्दळ असते. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीत परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाते. संध्याकाळी 5 ते रात्री 11 या वेळेत खासगी वाहनांचे अनधिकृत थांबे आणि प्रवाशांची गर्दी यामुळे अपघाताचा धोका अधिकच वाढला आहे. सिग्नल यंत्रणा, झेब्रा क्रॉसिंग आणि प्रभावी वाहतूक नियंत्रणाचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. कॉलेजचे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना दररोज जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागत आहे.

सोहम व्यासचा मृत्यू हा केवळ एक आकडा नसून, व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. आणखी किती निष्पाप जीव गेल्यावर प्रशासनाला जाग येणार? असा संतप्त सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

## मनुष्यबळाअभावी महापालिकेच्या कामकाजात 'खोडा'

**पिंपरी (दै. संध्या)**

तीस लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातील नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यास पालिकेच्या दैनंदिन कामकाजात वारंवार समस्या निर्माण होत आहेत. परिणामी, शहरात पाणीटंचाई, अस्वच्छता, ड्रेनेज तुंबणे, डासांचा त्रास, दुर्गंधी, अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, रस्त्यांवरील खड्डे, वाहतूककोंडी आदी तक्रारींच्या संख्या वाढल्या आहेत. तक्रारी तसेच, समस्या सोडवण्यास प्रशासनाकडून विलंब होत आहे. महापालिकेत तब्बल 5 हजार 992 जागा रिक्त असून, त्या जागा न भरल्याने अशी परिस्थिती निर्माण होत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. शहर एकूण 181 चौरस किलोमीटर क्षेत्रफळात विस्तारले आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे.

नागरी सुविधा तसेच, दैनंदिन कामकाजात वाढ होत आहे. महापालिका भवनासह सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयावर कामाचा ताण वाढ आहेत. त्यात प्रत्येक महिन्यास वयोमानानुसार व स्वेच्छानिवृत्तीने 50 ते 100 अधिकारी व कर्मचारी निवृत्त होत आहेत; मात्र त्यानंतर त्या पदाची भरती केली जात नसल्याने 31 मार्च 2026 पर्यंत वर्ग एक ते चारमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तब्बल पाच हजार 992 जागा रिक्त आहेत. अनेक महिने रिक्त राहिलेल्या पदाचा अतिरिक्त भार इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर टाकला जातो. स्वत:कडील कामकाज त्यात अतिरिक्त जबाबदारी असल्याने त्यांची तारांबळ उडते. तर, अनेक महिने पदे रिक्त ठेवली जात असल्याने महापालिकेच्या दैनंदिन कामकाजांचा खोळंबा होत असून, विकासकामांवर त्यांचा परिणाम होत असल्याचे दिसत आहे. वाढत्या लोकसंख्येला नागरी सुविधा पुरविताना महापालिकेची दमछाक होत आहे. त्यात मनुष्यबळ कमी असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे. महापालिकेच्या नवीन आकृतीबंधानुसार एकूण 11 हजार 515 पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ 6 हजार 500 पदांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. दर महिन्यास 50 ते 100 अधिकारी व कर्मचारी निवृत्त होत आहेत. त्या जागांवर नोकर भरती होत नसल्याने अनेक महत्वाची पदे रिक्त आहेत.

## शहरात पाणीकपात नाही; महापालिका आयुक्तांची माहिती

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड समन्यायिक पद्धतीने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे आणखी पाणीकपात करण्यात येणार नाही, असे महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता असल्याने पिंपरी-चिंचवड व पुणे महापालिका हद्दीत पुढील काही महिने 15 टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड व पुणे शहरासाठी 31 जुलैपर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवले जाते. यावर्षी पाऊस कमी असल्याने जलसंपदा मंत्र्यांच्या सूचनेवरून 31 ऑगस्टपर्यंत पाणी राखीव ठेवण्यात येणार आहे. पाणीकपातीमुळे वाचलेले पाणी शहरवासीयांना पुढील काही महिन्यांत वापरता येणार आहे. पाणीकपात करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. त्या संदर्भात विचारले असता आयुक्त बोलत होते.

आयुक्त सूर्यवंशी म्हणाले की, गेल्या सव्वासहा वर्षांपासून पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या पवना धरणातून तसेच, आंद्रा धरणातील इंद्रायणी नदीच्या निघोजे बंधाऱ्यातून पाणी उचलले जात आहे. जलसंपदा विभागाच्या सूचनेपूर्वीच शहरात पाणीकपात सुरूच आहे. त्यामुळे नव्याने पाणीकपात केली जाणार नाही.

महापालिकेकडून घेतले जाणारे पाणी प्रकिया करून नदी पात्रात सोडले जात नसल्याने जलसंपदा विभागाने महापालिकेस दंड लावला आहे. याप्रकारे त्यांनी राज्यातील अनेक महापालिकांना दंड लावला आहे. पाणी शुल्क व दंडाची रक्कम भरण्याची कार्यवाही केली जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शहरातील अनधिकृत बांधकामे, पत्राशेड व अतिक्रमणावर नियमितपणे कारवाई केली जाणार आहे. त्या दृष्टीने नियोजन केले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# आकुर्डी म्हाळसाकांत चौकात सिग्नल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

**आकुर्डी (दै. संध्या)**

म्हाळसाकांत चौकातील स्वयंचलित सिग्नल यंत्रणा दोन दिवसांपासून बंद आहे. या चौकातील सिग्नल यंत्रणा बंद झाल्यानंतर वाहतूक विभागाने येथे पोलिस नियुक्त करणे गरजेचे होते. परंतु दोन दिवसांपासून ना सिग्नल यंत्रणा पूर्ववत केली ना वाहतूक पोलिस नियुक्त केला. यामुळे चौकात वाहतूक कोंडी होत असून लहान मोठे अपघात घडत आहेत. यामुळे संबंधित विभागाने येथील सिग्नल यंत्रणा त्वरित पूर्ववत करावी, अशी मागणी होत आहे.

वाहतूक नियंत्रण करणारी सिग्नल व्यवस्था सलग दोन दिवसांपासून बंद असल्याने आकुर्डी, निगडी, चिंचवड या भागांना जोडणारा मध्यवर्ती ठिकाणचा चौक म्हणून म्हाळसाकांत चौक ओळखला जातो. या चौकात सातत्याने चारही बाजूने वाहनांची गर्दी असते.



जवळच म्हाळसाकांत विद्यालय, प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, सीएमएस विद्यालय, सरस्वती विद्यालय, गुरुगणेश विद्यालय असे अनेक शाळा, महाविद्यालये असून, या ठिकाणी सातत्याने विद्यार्थ्यांची व पालकांची ये-जा सुरू असते. त्याचबरोबर शाळा सुटते वेळी व भरतीवेळी मोठ्या प्रमाणात पालक-विद्यार्थी, खासगी वाहने, विद्यार्थी वाहतूक बस यांची गर्दी असते.

म्हाळसाकांत चौकातून निगडी, आकुर्डी रेल्वे स्टेशन, चिंचवड, आकुर्डी गावठाण या ठिकाणी जाण्यासाठी या चौकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. गेले दोन दिवसांपासून या चौकातील वाहतूक सिग्नल व्यवस्था पूर्णपणे बंद असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन छोटे-मोठे अपघात या ठिकाणी घडतात. मात्र वाहतूक विभागाने येथे कोणतीही उपाययोजना केलेली दिसून येत नाही. शनिवार आणि रविवार शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असल्याकारणाने वाहतूक कोंडी काहीशी नियंत्रणात होती.

मात्र, हीच परिस्थिती सोमवारी राहिली तर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागेल. यासाठी वेळीच उपाययोजना करून वाहतूक विभाग व महापालिका प्रशासनाने कार्यवाही करून स्वयंचलित वाहतूक यंत्रणा सुरळीत करावी,अशी मागणी ज्येष्ठ नागरिक व स्थानिक वाहनचालकाकडून होत आहे.

# हिंजवडीसाठी पुणे मेट्रो 3 ला गती; मे 2026 पर्यंत सेवा सुरू

## वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मेट्रो प्रकल्पाचा पीएमआरडीएकडून सखोल आढावा

**पिंपरी (दै. संध्या)**

हिंजवडी आयटी पार्कची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सक्षम पुणे मेट्रो 3 धावण्यास अवघा महिना बाकी आहे. मे 2026 अखेर यातील काही स्थानके प्रवाशांसाठी सुरू करण्यात येणार आहेत. त्या कामाचा आढावा पीएमआरडीए प्रशासनाकडून नुकताच घेण्यात आला. या कामाला वेग आल्याची माहिती मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी दिली.

मेट्रो मे 2026 पर्यंत कार डेपो ते स्थानक क्र. 12 दरम्यान पहिल्या टप्प्यात धावण्याचे ध्येय समोर ठेवून 'पीएमआरडीए' प्रशासनाकडून आढावा घेण्यात येत आहे. प्रकल्पाचा सूक्ष्म आराखडा आणि प्रत्यक्ष कामाची नेमकी गती, याबाबत मुख्य अभियंता पठाण यांनी स्थानक क्र. 9 ला भेट देऊन पाहणी केली. कामाचा दर्जा आणि नियोजित कालमर्यादेचे पालन करण्यावर त्यांनी यावेळी विशेष भर दिला. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित कंत्राटदाराला पत्र देखील देण्यात आले आहे.




दरम्यान, पहिल्या टप्प्यात 12 स्टेशन धावण्यासाठी स्थानकाचे कामे देखील त्याच पटीत पूर्ण होणे अपेक्षित आहे. ज्या स्थानकांची कामे पूर्ण झाली आहेत, ती स्थानके पहिल्या टप्प्यात प्रवाशांसाठी खुली करण्यात येणार आहेत. त्यानंतर टप्याटप्याने इतर स्थानके सुरु करण्यात येतील, असे पीएमआरडीएकडून सांगण्यात आले.

हा प्रकल्प मे 2026 पर्यंत सुरू करण्याबाबत खुद्द मुख्यमंत्री यांनी आदेश दिल्याने पीएमआरडीए प्रशासन खडबडून जागे झाले आहे. त्यामुळे आता सूक्ष्म आराखड्यानुसार कामाच्या प्रगतीच्या पाहणीसाठी 'ग्राउंड झिरो'वर भर देण्यात आला आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण करून पुणेकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करण्यासाठी 'पीएमआरडीए'कडून आढावा घेण्यात येत आहे.

# रामोशी समाजाला विधानसभेत नेतृत्व देणार

## बहुजन परिवार संवाद मेळाव्यात गोपीचंद पडळकर यांची घोषणा





**पुरंदर (दै. संध्या)**

भटक्या-विमुक्त जमातींच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जेजुरी येथील मल्हार नाट्यगृहात बहुजन परिवार संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

या मेळाव्याचा मुख्य उद्देश जय मल्हार क्रांती सेनेचे नेते दौलत नाना शितोळे यांना भारतीय जनता पक्षाच्या कोट्यातून विधान परिषदेत संधी मिळावी, यासाठी पाठिंबा दर्शवणे हा होता. या मागणीला पाठिंबा देण्यासाठी आपण उपस्थित असल्याचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना पडळकर म्हणाले की, जेजुरीचा खंडोबा, पंढरपूरचा विठोबा, कोल्हापूरचा ज्योतिबा आणि बिरोबा ही बहुजन समाजाची दैवतं आहेत. भटक्या-विमुक्त समाज आपल्या नवसासाठी या दैवतांपुढे प्रार्थना करत आहे. बहुजनांच्या हिताचे निर्णय घेणारी सत्ता आज राज्यात असून, समाजाचे प्रश्न मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

दौलत नाना शितोळे हे मुख्यमंत्र्यांचे निकटवर्ती असल्याने त्यांच्या प्रतिनिधित्वाबाबत कोणतीही चिंता नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, राज्यात सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व देण्याचे काम सुरू असून भविष्यात भटक्या-विमुक्त समाजातील सामान्य कार्यकर्त्यांनाही संधी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विधानसभा मतदारसंघांची रचना अधिक पारदर्शक आणि न्याय्य करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना, एकाच घरात अनेक मंत्री असण्याऐवजी सर्व समाजघटकांना समान संधी मिळणे हेच देशहिताचे असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.

या संवाद मेळाव्यात आराधी, वाघ्या-मुरळी, वासुदेव, भराडी, डवरी, रामोशी, कोल्हाटी, गुरव, कोळी, वीर गडशी आदी विविध भटक्या-विमुक्त जाती-धर्मांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध राज्यांतून आलेल्या समाजबांधवांनी आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास दही-दूधाचा अभिषेक करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

जेजुरी नगर प्रदक्षिणेदरम्यान आराधी, वासुदेव, भारुडी आदी लोककलांच्या सादरीकरणामुळे मेळाव्याला विशेष रंग चढला. या कार्यक्रमास जेजुरीचे नगराध्यक्ष जयदीप बारबाई, नगरसेवक रोहित खोमणे, जय मल्हार क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश जाधव यांच्यासह विविध भटक्या-विमुक्त समाज संघटना, प्रतिष्ठान व मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ख्यातनाम गायिका आशा भोसले मंगेशकर यांना संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, तर राष्ट्रीय गीताने समारंभाची सांगता करण्यात आली.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...




### नारायणगावला मुक्ताबाई देवी व काळोबा देवाच्या यात्रेला उत्साहात सुरुवात

नारायणगाव (दैनिक संध्या) : जिल्ह्यातील सर्वात भव्य असणाऱ्या नारायणगाव येथील महाराष्ट्र राज्य 'ब' वर्ग तिर्थक्षेत्र ग्रामदैवत श्री.मुक्ताबाई देवी व श्री काळोबा देवाच्या यात्रेला सुरुवात झाली. श्री. मुक्ताबाई व काळोबा देवस्थानकडून १३ ते २० एप्रिल दरम्यान यात्रा संपन्न होणार असून यात्रेनिमित्त देवस्थान ट्रस्टकडून ८ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम, छबीना मिरवणूक, चोळी पातळ, शेरणी वाटप, कुस्त्यांचा भव्य आखाडा, ढोल ताशांच्या गजरात घागरी मिरवणूक, हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असणारे शोभेचे दारुकाम, विविध प्रकारचे पाळणे, खवय्याची लज्जत, तसेच तमाशा पंढरी यात्रेचे आकर्षण म्हणजे आठही दिवस लोकनाट्य तमाशा कार्यक्रमांचे आयोजन असून या यात्रेची सुरुवात शुक्रवारी (दि. ३ एप्रिल) रोजी जुनी परंपरा असलेला कांबळा गावबैठक बसवून करण्यात आले. यात्रेनिमित्त मंदिरास, पूर्व वेस व गावात रोषणाईसह आकर्षक सजावट करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे आयोजक उपसरपंच योगेश उर्फ बाबु पाटे, संतोष खैरे, एकनाथ शेटे व संतोष वाजगे, विकास तोडकरी, अजित वाजगे यांनी दिली. आज पहिला दिवस दि.१३ एप्रिल रोजी यात्रेला प्रारंभ झाला असून यानिमित्त सकाळी ९ ते १० या वेळेत गावातून सवाद्य उत्सवमूर्ती व पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच तुकाराम खेडकर व पांडुरंग मुळे यांच्या पुण्यतिथी निमित्तत्यांच्या प्रतिमेची मिरवणूक, रात्री १० वाजता चंद्रकांत ढवळपुरीकर किरण कुमार ढवळपुरीकर यांचा लोकनाट्य कार्यक्रम, १४ एप्रिल रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ या दरम्यान देवीचा उत्सव मांडव-डहाळे, शेरणी नैवेद्य, सायंकाळी ५ वाजता भाऊ बापू नारायणगावकर व विठाबाई भाऊ नारायणगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक, रात्री ८ वाजता देवीस चोळी पातळ, रात्री ११ वाजता आनंद लोकनाट्य मंडळ यांचा लोकनाट्य कार्यक्रम होणार आहेत. तर मुख्य दिवस म्हणजे १५ एप्रिल रोजी सकाळी ७ ते १० काळोबा देवस्थान मांडव डहाळे, व मुक्ताई देवीस देवीस चोळी पातळ, शेरणी नैवद्य, सायंकाळी ५ वाजता छत्रपती शाहू महाराज व महात्मा फुले जयंतीनिमित्त मिरवणूक, सायंकाळी ८ वाजता छबिना मिरवणूक रात्री ९ वाजता शोभेचे दारूकाम, रात्री तुकाराम खेडकरसह पांडुरंग मुळे यांचा लोकनाट्य कार्यक्रम. तर १६ एप्रिल रोजी दुपारी ४ ते रात्री ८ वा डबल महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख व भारत केसरी निरू गुजर यांची कुस्ती होणार असून कुस्त्यांचा जंगी आखाडा. रात्री ९. ३० वा मालती इनामदार यांचा लोकनाट्य कार्यक्रम, तसेच १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक, रात्री ९. ३० वाजता विठाबाई नारायणगावकर यांचा लोकनाट्य कार्यक्रम, तर १८ एप्रिलला शिवजयंती उत्सव, रात्री ९.३० वा मंगला बनसोडे यांचा लोकनाट्य कार्यक्रम, दि.१९ एप्रिल रोजी रात्री ९. ३० वा भिका भीमा सांगवीकर यांचा लोकनाट्य कार्यक्रम, तर शेवटचा दिवस दि.२० एप्रिल रोजी रात्री ९. ३० वा निलेश कुमार अहिरेकरसह रुपाली पुणेकर यांचा लोकनाट्य तमाशाने यात्रेची सांगता होणार आहे.

### बापुराव चौधरी यांना 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार 2026' जाहीर

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : महाराष्ट्राची भूमीचे पत्रकार 'महा सुपरफास्ट न्यूज'चे उपसंपादक बापुराव चौधरी यांना उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठान, नीती आयोग, तसेच एमएसएमई मंत्रालय सलग्न संस्थांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. बापुराव चौधरी यांनी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधीलकी आणि समाजसेवा या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. त्यांनी दीर्घकाळ निरलस भावनेने समाजोपयोगी कार्य करत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजात रुजविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यास हातभार लागला असून ते आदर्शवत मानले जात आहे. अलीकडेच त्यांनी आपल्या कृतार्थ जीवनातील अनेक वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा आणि रचनात्मक कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने हा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे आयोजक डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले. हा पुरस्कार राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा ठरेल, तसेच समाजात राष्ट्रसेवेची भावना वृद्धिंगत करण्यास हातभार लावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. पुरस्कार वितरण समारंभ सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी पुणे येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह येथे होणार असून कार्यक्रमाचा सविस्तर तपशील लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. याप्रसंगी पत्रकार सचिन सुंबे, सुवर्णा कांचन, महंत गोपालव्यास कपाटे, सहदेव खंडागळे, सुनिल तुपे, खलिल शेख, ह. भ. प. सुरेश कांचन, शिवराज साने सह विविध क्षेत्रातुन शुभेच्छांचा वर्षाव झाला.



### आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांची 50 हजारांची उलाढाल

नारायणगाव (दैनिक संध्या) : बेल्हे (ता.जुन्नर) येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये फन फेअर (आनंद यात्रा) चे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे स्टॉल व फनी गेम्स लावण्यात आले होते. विविध पदार्थ बनवण्यापासून ते विक्री पर्यन्त सर्व कामे विद्यार्थ्यांनी व्यवस्थित पार पाडली. या मध्ये विक्री करून विद्यार्थ्यांनी ५० हजार रुपयांची उलाढाल केली. मुलांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी, प्रत्यक्ष कृतीतून व्यवहार ज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी तसेच दैनंदिन जीवनात भाज्या कापणे, एखादा पदार्थ बनवणे, बाजारातून वस्तू आणणे, त्याचा हिशोब ठेवणे, खरेदी - विक्री करणे याचे प्रत्यक्ष शिक्षण देण्यासाठी आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या यात्रेत पाणीपुरी, छोले-बटुरे, समोसा, वडापाव, मंचूरियन, पाणीपुरी, भेळ, लिंबू सरबत, टरबूज, मिठाई, दाबेली, सँडविच, मसाला पापड, कैरी पन्हं, भेळपुरी, जूस, भेळ, चायनिज भेळ, मटकी चॅट,फूड सॅलड, इडली, चणा चॅट अशा विविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. या वेळी काही खाद्यपदार्थ विद्यार्थांनी घरून बनून आणले होते तर काही शिक्षकांच्या मदतीने शाळेत बनवण्यात आले. या बाल आनंद मेळाव्यातील विद्यार्थ्यांचे कौतुक संस्थेचे संस्थापक सीए सावकार गुंजाळ, अध्यक्ष गोपीनाथ शिंदे, सीईओ शैलेश ढवळे, सर्व संचालक मंडळाने केले.मेळाव्याचे उद्घाटन विश्वस्त दावला कणसे, प्राचार्य विद्या गाडगे, उपप्राचार्य के.पी सिंग, पालक यांच्या हस्ते संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या उत्साहात आनंद मेळावा पार पडला.

---

## श्रीकृष्ण मंदिराचे उद्घाटन, कलशारोहण सोहळा संपन्न

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य उद्घाटन कळसारोहण मुर्ती स्थापना आदी सोहळ्याचे आयोजन परम पूज्य कै. मंयकराज बाबा जिंतुकरकर यांची स्वप्नपुरती पु तपस्वनी अरुना ताई जितुकर, तपस्वीनी उर्मिला ताई जिंतुरकर, धर्म कुमार अक्षय जिंतुकरकर, सर्व ग्रामस्थाच्या सहकार्यातुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या सोहळ्याला परिसरातील भाविक, नागरिक तसेच विविध मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या सोहळ्याची सुरवात गितापाठ पारायणानी झाली.

ध्वजारोहण मंहत पातुरकर बाबा यानी केले. कलशारोहण आचार्य श्री नागराज बाबा उपाख्य आत्याबाई याने केले. मंदिर उद्घाटन आचार्य श्री कृष्णराज बाबा शिक्रापूर यानी केले. गर्भगृहाचे उद्घाटन आचार्य श्री अकुळनेकर बाबा नारायणगाव यानी केले आणी मुर्ती स्थापना आचार्य श्रीमुकुंदराजबाबा कपाटे कासारसाई यानी केले. सभागृहाचे उद्घाटन आचार्य बायराज बाबा जामोदेकर कारेगाव यानी केले. संन्यास दिक्षा विधी मंहत दिवाकर बाब जातेगाव याच्या हस्ते देण्यात आला.दिप प्रज्वलन पाच आचार्याच्या हस्ते करण्यात आले.

---

## एमएससीबीच्या कारभारावर नागरिकांचा संताप

### वीज खंडित प्रकारामुळे व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक हैराण

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

उरुळी कांचन (ता. हवेली) येथे सततच्या होणाऱ्या वीज खंडित प्रकारामुळे व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक हैराण झाले असून संताप व्यक्त करत आहेत. दिवसभरात केवळ काही तासच वीजपुरवठा होत असल्याने उर्वरित वेळ अंधारात काढावा लागत आहे.



स्थानिक कारखानदार सचिन कांचन यांनी सांगितले की, वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे व्यवसाय अक्षरशः ठप्प झाला आहे. मशीनरी व उपकरणे बंद पडण्याच्या मार्गावर असून कामगारांना काम असतानाही बसुन पगार द्यावा लागत आहे. शनिवारी तर अर्ध्या तासाला वीज ये-जा होत असल्याने कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले. व्यापारी वर्गाने प्रश्न उपस्थित केला आहे की, आम्ही वेळेवर वीज बिल भरत असताना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा का मिळत नाही? छुप्या पद्धतीने लोडशेडिंग सुरू आहे का? असा संशयही व्यक्त केला जात आहे.

शेतकरी वर्गाचीही मोठी अडचण झाली आहे. वीज येते कधी आणि जाते कधी याचा काहीच अंदाज राहत नाही. शेतपंप सुरू करण्यापूर्वीच वीज खंडित होत असल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. उरुळी कांचनमधील सततच्या वीज खंडित प्रकारामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांना तात्काळ सुरळीत वीज पुरवठा मिळावा. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी ग्राहकांकडून वीज बिलांमध्ये विविध प्रकारचे सेवा शुल्क व कर आकारते. मात्र त्या प्रमाणात दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा पुरविताना दिसत नाही. दुकाने, लघुउद्योग, कारखाने, वर्कशॉप्स, सेवा व्यवसाय, हॉटेल, हॉस्पिटल तसेच ऑनलाइन व्यवहार आशा अनेक क्षेत्रांचे काम वीजेअभावी ठप्प होते. याशिवाय फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ व औषधे यांसारख्या नाशवंत वस्तूंचे नुकसान होते. अंधारामुळे व्यापाऱ्यांच्या सुरक्षेच्याही समस्या निर्माण होत आहेत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून महावितरण ने तातडीने दखल घेऊन वीज पुरवठ्यातील त्रुटी सुरळीत कराव्यात, तसेच दुरुस्ती यंत्रणा अधिक सक्षम व कार्यक्षम करावी,

---

## मेफेड्रोन विक्री प्रकरणात विधिसंघर्षित बालक ताब्यात

### अमली पदार्थांविरोधातील मोहिम; पुणे ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

**कवठे येमाई (दै. संध्या)**

अमली पदार्थांविरोधातील मोहिमेत पुणे ग्रामीण पोलिसांना मोठे यश मिळाले असून मेफेड्रोन (एम.डी.) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका विधिसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण व शिरूर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त पथकाने दि.११ ला करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शिरूर उपविभागात गुन्हे नियंत्रण व अमली पदार्थविरोधी मोहीम राबवत असताना, शिरूर बायपास येथील बंद पडलेल्या "नाना स्पॉट" हॉटेल परिसरात एक बालक



मेफेड्रोनची विक्री करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीची तत्काळ वरिष्ठांना कल्पना देण्यात आली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस स्टेशनच्या मदतीने सापळा रचण्यात आला.कारवाईदरम्यान संबंधित विधिसंघर्षित बालकाला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे १ लाख ३८ हजार ८०० रुपये किंमतीचा ६.९४ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एम. डी.) हा अमली पदार्थ आढळून आला आहे.

या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ३२१/२६ नोंद करण्यात आला असून एनडीपीएस कायदा कलम ८(क), २१(ब) तसेच बीएनएस कलम ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे ग्रामीण व शिरूर पोलीस करत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे तसेच पोलीस कर्मचारी शुभम चव्हाण, तुषार पंदारे, जनार्दन शेळके, राजू मोमीन, संजू जाधव, अक्षय कळमकर व नीरज पिसाळ यांनी ही यशस्वी कारवाई केली.पुणे ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करत अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

---

## चाकण मधील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रश्न सुटला

**चाकण (दै. संध्या)**


गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या चाकणच्या चक्रेश्वर मंदिराचा व चाकणच्या स्मशानभूमीच्या रस्त्याचा व परिसराच्या विकासाचा गंभीर प्रश्न अखेर सुटला आहे.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांनी या रस्त्याच्या कामांसाठी एकूण ६ कोटी, २२ लाख रुपयांचा निधी दिला असल्याचे नगरसेवक साहेबराव कड यांनी सांगितले. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी या कामासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. साळुंखे वस्ती ते मुक्ताई चौक या रस्त्याच्या कामाची पाहणी स्वतः मोहिते पाटील यांच्यासह चाकण नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, राष्ट्रवादी गटनेते साहेबराव कड पाटील यांनी केली. यावेळी नगरसेविका विजया तोडकर, ॲड. वर्षा शेवकरी, सागर बनकर, आकाश जाधव, तृप्ती जगनाडे, विजया जाधव, धीरज मुटके, रेश्मा मुटके, विकास धाडगे आदी उपस्थित होते.

रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून, लवकरच हनुमान मंदिर ते चक्रेश्वर मंदिर या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याचे गटनेते साहेबराव कड, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ व नगरसेविका विजया तोडकर यांनी सांगितले.

---





## जेजुरीत श्री मार्तंड केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत दीडशे वर्षानंतर आयोजित ग्रामदेवता जानाई देवीच्या यात्रेत श्री मार्तंड देवसंस्थान च्या वतीने श्री मार्तंड केसरीचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते करण्यात आले.

नवीन पालखी मैदानावर आयोजित कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी सोलापूरचा सिकंदर शेख आणि महाराष्ट्र केसरी कोल्हापूरचा पृथ्वीराज पाटील यांच्यात प्रथम क्रमांकासाठी अतिशय चुरशीची कुस्ती झाली. सुमारे पन्नास मिनिटे एकमेकांना डाव प्रतीडाव टाकीत शेवट पर्यंत आव्हान दिले.अखेर ही कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली.

या दोन्ही मल्लांना श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने श्री मार्तंड केसरीचा किताब, चांदीची गदा व रोख रक्कम देवून गौरविण्यात आले.

दुसऱ्या क्रमांकाच्या कुस्तीत महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे याने पंजाबच्या शांटीकुमारला दुसऱ्या मिनिटात आस्मान दाखवीत विजय मिळविला. मल्ल शाहरुख खान, अनिकेत मांगडे यांनी ही चुरशीच्या लढतीत विजय मिळविला.

या कुस्तीच्या आखाड्यासाठी ट्रीपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी, विजय बनकर, किरण भगत, वाघोली येथील महाराष्ट्र केसरीचे आयोजक रामकृष्ण सातव उपस्थित होते.

या श्री मार्तंड केसरी कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी दहा हजाराहून अधिक कुस्ती शौकीन उपस्थित होते. सर्वच कुस्त्या साठी मोठ्या प्रमाणात शौकिनानी बक्षिसे दिली. दीडशे वर्षानंतर भरलेल्या कुस्ती स्पर्धेत नागरिकांनी आनंद लुटला.

श्री मार्तंड देवसंस्थान चे अध्यक्ष मंगेश घोणे, विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, डॉ. राजेंद्र खेडेकर, पोपट खोमणे, विश्वास पानसे, अनिल सौंदड, अभिजित देवकाते, नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, जेजुरी ग्रामदेवता जाना ई देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर गोडसे, छबन कुदळे,गणेश आगलावे,श्री खंडोबा पालखी सोहळा व ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, कृष्णा खोमणे, सुयोग राऊत, सुरेश उबाळे, नारायण जाधव, संतोष खोमणे, संजय शेवाळे व ग्रामस्थांनी या स्पर्धेचे अतिशय देखणे नियोजन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अमरनाथ यात्रा 3 जुलैला सुरु होणार; 15 एप्रिलपासून नोंदणी

जम्मू : दक्षिण काश्मीरमधील प्रसिद्ध अमरनाथ गुफा मंदिराची वार्षिक तीर्थयात्रा यावर्षी ३ जुलैपासून सुरू होणार असून ती ५७ दिवसांच्या कालावधीनंतर २८ ऑगस्ट रोजी संपन्न होईल. जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी रविवारी या यात्रेच्या नियोजनाची घोषणा केली. यात्रेसाठी भाविकांची नोंदणी १५ एप्रिलपासून सुरू होणार असून, देशभरातील ५५६ बँक शाखांमध्ये तसेच श्री अमरनाथजी श्राइन बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### पश्चिम बंगालमधील मतदारयाद्यांबाबत सुप्रीम कोर्टात आज निकाल

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : पश्चिम बंगालमध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाबाबत (एसआयआर) दाखल याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज सोमवारी सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होईल. पहिल्या टप्प्यात मतदान होणाऱ्या विधानसभा जागांसाठी मतदारयाद्या अंतिम करून निवडणूक आयोगाने ९ एप्रिल रोजी त्या गोठवल्या होत्या. निवडणूक आयोगाने शनिवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २३ एप्रिल रोजी १६ जिल्ह्यांतील ३.६ कोटींहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पात्र असतील. या आकडेवारीनुसार पहिल्या टप्प्याच्या मतदारयादीत १.८४ कोटी पुरुष, १.७५ कोटी महिला आणि ४६५ तृतीयपंथीयांचा समावेश आहे.

### सोन्या-चांदीच्या किंमतीत मोठी घसरण

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : १३ एप्रिल २०२६ रोजी सोन्या-चांदीच्या किंमतीत मोठी घसरण पाहायला मिळत आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया (MCX) वर बाजार उघडताच सोन्याच्या भावात १,०४० रुपये आणि चांदीच्या भावात ५,३३९ रुपयांची घसरण नोंदवण्यात आली. एकीकडे कमोडिटी बाजार कोसळताना दिसत आहे, तर दुसरीकडे डॉलर इंडेक्समध्ये मजबूती कायम आहे. देशांतर्गत कमोडिटी बाजारावर डॉलर इंडेक्समधील मजबुतीचा स्पष्ट परिणाम दिसून येत आहे. एमसीएक्सवर बाजार उघडताच सोन्याचा भाव १,५१,६५० रुपये प्रति १० ग्रॅम आणि चांदीचा भाव २,३७,९६१ रुपये प्रति किलोवर आला. गेल्या आठवड्याच्या शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी सोन्याची किंमत १,५२,६९० रुपये प्रति १० ग्रॅम आणि चांदीचा भाव २,४३,३०० रुपये प्रति किलोवर बंद झाला होता. दरम्यान, आंतरराष्ट्रीय कमोडिटी बाजारात सकाळी सोन्या-चांदीच्या किंमतीत मोठी वाढ पाहायला मिळाली. अमेरिका आणि इराणमधील चर्चा यशस्वी न झाल्यामुळे कमोडिटी बाजारात घसरण होत असून, हा तणाव लवकर संपला नाही तर ही घसरण पुढेही सुरू राहू शकते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दिल्ली: २४ कॅरेट सोन्याची किंमत १,५२,९८० रुपये प्रति १० ग्रॅम, २२ कॅरेट १,४०,२४० रुपये आणि १८ कॅरेट १,१४,७७० रुपये प्रति १० ग्रॅम झाली आहे. मुंबई: २४ कॅरेट सोन्याचा भाव १,५२,८३० रुपये, २२ कॅरेट १,४०,०९० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याचा दर १,१४,६२० रुपये प्रति १० ग्रॅम आहे. चेन्नई: २४ कॅरेट सोन्याची किंमत १,५३,८१० रुपये, २२ कॅरेट १,४०,९९० रुपये आणि १८ कॅरेटचा भाव १,१७,५९० रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. कोलकाता: २४ कॅरेट सोन्याचा भाव १,५२,८३० रुपये, २२ कॅरेट १,४०,०९० रुपये आणि १८ कॅरेटचा दर १,१४,६२० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचलाय. प्रमुख शहरांतील चांदीचे दर : दिल्ली, मुंबई आणि कोलकाता या शहरांमध्ये आज चांदीचा भाव २,५९,९०० रुपये प्रति किलो आहे. तर चेन्नईमध्ये चांदीचा दर २,६४,९०० रुपये प्रति किलो इतका नोंदवण्यात आला आहे.

### महिला आरक्षणासाठी पंतप्रधानांनी सर्वच पक्षांकडून मागितले समर्थन

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : एप्रिलपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या तीन दिवसांच्या विशेष अधिवेशनात 'महिला आरक्षण दुरुस्ती विधेयक' एकमताने मंजूर करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेतील सर्व राजकीय पक्षांच्या गटनेत्यांना पत्र लिहून केले आहे. या दुरुस्तीला पाठिंबा देण्याची खासदारांना विनंती करताना मोदी यांनी म्हटले आहे की, हा क्षण कोणत्याही एका पक्षापेक्षा किंवा व्यक्तीपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. या विशेष अधिवेशनात एका ऐतिहासिक चर्चेचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये 'नारी शक्ती वंदन अधिनियम' लागू करण्याचा मार्ग मोकळा होईल. सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी काँग्रेसने १५ एप्रिल रोजी सर्व विरोधी पक्षांची बैठक बोलावली आहे. विरोधी पक्षांची अशी मागणी आहे की, संविधानातील कलम ३३४-अ ची अंमलबजावणी केली जावी. हे कलम लोकसभा आणि विधानसभांच्या एकूण जागांपैकी (अनुसूचित जाती आणि जमातींसाठी राखीव असलेल्या जागांसह) एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद करते. विरोधी पक्षांनी विशेषतः दक्षिण भारतातील पक्षांनी २०११ च्या जनगणनेवर आधारित परिसीमन प्रक्रिया राबवण्याच्या सरकारच्या योजनेला तीव्र विरोध दर्शवला आहे. परिसीमन विधेयक मंजूर झाले तर २०२९ मध्ये लोकसभेतील जागांची संख्या ५४३ वरून वाढून ८१६ होईल आणि त्यापैकी २४७ जागा महिलांसाठी राखीव असतील. २०११ च्या जनगणनेवर आधारित परिसीमनामुळे कोणत्याही राज्याची एकही लोकसभा जगा जागा घटणार नाही, असे भाजपने म्हटले. पंतप्रधान मोदींच्या या पत्राला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. विधेयकाबाबतचे तपशील उघड न करताच विरोधकांचे सहकार्य मागत आहे. केंद्र सरकार हे विधेयक लागू करण्यासाठी जी घाई करत आहे, ती महिलांचे सक्षमीकरण करण्यापेक्षा राजकीय लाभ मिळवण्यासाठी अधिक आहे, अशी टीका खरगे यांनी केली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत २९ एप्रिलनंतर सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. संसदेचे हे सत्र बोलावण्यापूर्वी आपल्याला विश्वासात घेतले नसल्याचे खरगे म्हणाले.

### 5 किलो LPG सिलिंडर विक्रीने ओलांडला 13 लाखांचा टप्पा

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : अमेरिका आणि इराणमधील तणावामुळे भारतातील गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कमी उत्पन्न गट आणि स्थलांतरित कामगारांना दिलासा देण्यासाठी ५ किलो LPG सिलेंडरचा पुरवठा वाढवण्यात आला असून, पाइप गॅस (PNG) कनेक्शनचा विस्तारही वेगाने करण्यात येत आहे. अधिकृत माहितीनुसार, २३ मार्चपासून आतापर्यंत ५ किलोच्या १३ लाखांहून अधिक LPG सिलेंडरची विक्री झाली आहे दररोज १ लाखांपेक्षा जास्त सिलेंडर विकले जात आहेत सरकारने विशेषतः स्थलांतरित कामगार आणि कमी उत्पन्न गटापर्यंत पोहोच वाढवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. या कालावधीत ४.३४ लाखांहून अधिक नवीन PNG कनेक्शन देण्यात आले ३०,००० पेक्षा अधिक ग्राहकांनी LPG कनेक्शन सरेंडर करून PNG स्वीकारले.

# तृणमूलने मदरशांना 6 हजार कोटी दिले

## सिलीगुडीतील सभेत पंतप्रधान मोदींची टीका



कोलकाता (दै. संध्या)

तृणमूल काँग्रेसने मदरशांसाठी 6000 कोटी रुपये खर्च केले; पण राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी काहीच केले नाही. हा पैसा केवळ त्यांच्या खास मतदारसंघासाठी वापरला गेला," अशी घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केली. पश्चिम बंगाल दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मोदी यांनी सिलीगुडी येथे जाहीर सभा घेतली. त्यांनी दार्जिलिंगमधील 5 आणि जलपाईगुडी जिल्ह्यातील 7 मतदारसंघांतील भाजप उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. उत्तर बंगालमध्ये भाजप आपली पकड मजबूत करण्यावर भर देत असल्याचे या सभेतून स्पष्ट झाले.

सभेत मोदी यांनी सीएएचा उल्लेख करत "कमळ फुलवा, घुसखोर हटवा" अशी घोषणा दिली. मोदी म्हणाले, तृणमूल सरकार कठोर आणि पक्षपाती आहे; मात्र आम्ही सीएएच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचा अधिकार सुरक्षित केला आहे. गेल्या 15 वर्षांत बंगालमध्ये काय झाले, याचा हिशोब आता जनतेसमोर द्यावा लागेल. तृणमूलचा बंगालमध्ये पराभव निश्चित आहे. सिलीगुडीतील ही सभा त्यांच्या झोपेचे खोबरे करेल. दार्जिलिंग आणि उत्तर बंगाल हा चहा उत्पादनासाठी प्रसिद्ध भाग आहे.

पण तृणमूल सरकारने चहाबागांकडे दुर्लक्ष केले. तुमच्या चहाचा स्वाद मला चांगला ठाऊक आहे; पण राज्य सरकार या उद्योगालाच नष्ट करत आहे. आसाममध्ये चहाबाग कामगारांच्या शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी काम झाले आहे. बंगालमध्येही अशा कुटुंबांना जमीन पट्टे देण्यात येतील.

**भीतीचे राजकारण आणि हिंसाचार**

मोदी यांनी आरोप केला की, उत्तर बंगालमध्ये तृणमूलची राजकारणाची पद्धत भीती निर्माण करण्यावर आधारित आहे. "लोकांना घाबरवणे, दुर्लक्ष करणे आणि राजकीय हिंसाचार करणे ही येथे सामान्य बाब झाली आहे. काही ठिकाणी नेत्यांच्या हत्या घडवल्या जातात," असा गंभीर आरोप त्यांनी केला.

# मथुरेतील वृंदावनमध्ये यमुना नदीत बोट उलटून १० पर्यटकांचा मृत्यू

मथुरा (दै. संध्या)



मथुरेतील वृंदावन येथे यमुना नदीत पर्यटकांनी भरलेली नौका उलटल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या भीषण अपघातात आतापर्यंत १० जणांचा बुडून मृत्यू झाला असून, २२ पर्यटकांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे. अद्यापही अनेक जण बेपत्ता असून शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

दुपारी पावणे तीन वाजेच्या सुमारास बांके बिहारी मंदिरापासून अडीच किलोमीटर अंतरावर असलेल्या केशी घाटाजवळ हा अपघात झाला. नदीतील पुलाजवळ भाविकांनी भरलेली ही नौका अचानक उलटली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि मदत व बचाव पथकांनी तातडीने धाव घेतली.

मथुरेचे जिल्हाधिकारी चंद्र प्रकाश सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, यमुना नदीत शोधमोहीम सातत्याने सुरू असून गोताखोर बेपत्ता लोकांचा शोध घेत आहेत. जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी तळ ठोकून असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, या नौकेत ३० हून अधिक प्रवासी होते आणि हे सर्व पर्यटक पंजाबमधील लुधियाना येथून वृंदावन दर्शनासाठी आले होते.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनेची गंभीर दखल घेत मृतांच्या वारसां प्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी 'X' (ट्विटर) वर पोस्ट करत म्हटले की, "मथुरा येथील ही दुर्घटना अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. जखमींवर योग्य उपचार करण्याचे आणि बचावकार्याला वेग देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. "ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. जखमींच्या लवकरात लवकर प्रकृती सुधारावी यासाठी मी प्रार्थना करतो," असे पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## पगारवाढीसाठी सहा कंपन्यातील कामगारांचा एकाचवेळी उद्रेक

गोंदिया (दै. संध्या)

नोएडामध्ये मद्रासनसह सहा कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी पगारवाढीच्या मागणीसाठी सुरू केलेल्या आंदोलनाला आज सकाळी हिंसक वळण लागले. हे कर्मचारी तीन दिवसांपासून आंदोलन करत होते. त्यांचे म्हणणे ऐकले जात नसल्याने, सकाळी कर्मचारी संतप्त झाले. त्यांनी रस्त्यावर उतरून दगडफेक केली आणि अनेक कार व बस जाळल्या. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी पोलिसांचे एक वाहन उलटवले. परिस्थिती चिघळल्याने जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यांतील पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी कर्मचाऱ्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फेकण्यात आल्या. ही घटना नोएडा फेज 2 मध्ये घडली.

पगारवाढीच्या मागणीसाठी कर्मचारी मद्रासन कंपनीबाहेर आंदोलन करत होते. त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्याने, आंदोलनाला अचानक हिंसक वळण लागले. तेथे उपस्थित असलेल्या 200 हून अधिक कर्मचाऱ्यांनी दगडफेक करण्यास सुरुवात केली. त्यांनी बाहेरून कंपनीच्या आतही दगडफेक केली. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या. नोएडाच्या फेज 2 मधील मद्रासन कंपनीबाहेर आंदोलन करणारे कर्मचारी अचानक हिंसक झाले. रात्री त्यांनी उभ्या असलेल्या पोलिसांच्या वाहनाची तोडफोड केली. त्यानंतर त्यांनी संपूर्ण वाहन उलटवून त्यातील सामान बाहेर फेकले.

## 'शबरीमला' २०१८ चा निकाल 'पुरुषांच्या श्रेष्ठत्वा'च्या कल्पनेवर आधारित'

नवी दिल्ली (दै. संध्या)

केरळमधील शबरीमला मंदिरात महिलांच्या प्रवेशावरून सुरू असलेल्या वादाबाबतची सर्वोच्च न्यायालयाचे नऊ न्यायाधीशांचे घटनापीठसासमोर सुरु आहे. या प्रकरणामुळे धार्मिक स्थळांमध्ये महिलांच्या प्रवेशाबाबत आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत व्यापक प्रश्न उपस्थित होतात, असा दावा केंद्र सरकारच्या वतीने नावणीवेळी करण्यात आला.

केंद्र सरकारच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, हे प्रकरण कोणत्याही एका लिंगाची बाजू घेणे किंवा त्याला विरोध करणे याबद्दल नसून, ते धार्मिक परंपरा आणि श्रद्धांशी संबंधित आहे. उदाहरणे देत त्यांनी निदर्शनास आणून दिले की, देशभरात अशी अनेक मंदिरे आहेत जिथे पुरुषांच्या प्रवेशावरही निर्बंध आहेत, किंवा जिथे पुरुषांना विशिष्ट परंपरांचे पालन करणे अनिवार्य असते.

सुनावणीदरम्यान, केरळमधील 'कोट्टनकुलंगारा श्री देवी मंदिरा'त पुरुष पारंपारिकपणे महिलांप्रमाणेच साडी नेसून पूजा-अर्चा करतात, या गोष्टीवरही प्रकाश टाकण्यात आला. ही परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे आणि ती धार्मिक श्रद्धांचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक धार्मिक स्थळाच्या स्वतःच्या अशा विशिष्ट परंपरा असतात आणि त्याकडे एकाच, समान दृष्टिकोनातून पाहिले जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने केला आहे.

सुनावणीच्या प्रक्रियेदरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के.एम. नटराज यांनी संविधानाच्या अनुच्छेद २५ आणि २६ चा अर्थ स्पष्ट करताना काही महत्त्वाचे युक्तिवाद मांडले.

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांना 'भिडला' त्याला दाखवला 'घरचा' रस्ता

मथुरा (दै. संध्या)



पश्चिम बंगाल निवडणुकीत आज पहिल्या टप्प्यातील मतदान होत आहे. याचदरम्यान, निवडणूक आयोगाच्या एका उच्चस्तरीय बैठकीत झालेल्या राड्याबाबतची बातमी समोर आली आहे. ही बैठक बुधवारी झाली होती. त्या बैठकीत बंगालमधील एक निवडणूक निरीक्षक थेट मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनाच भिडला. मात्र हे भिडणं त्या अधिकाऱ्याला महागात पडलं आहे. त्याला निरीक्षक पदावरून काढून टाकण्यात आलं आहे.

निवडणूक आयोगाच्या पूर्ण बेंचने एक व्हर्च्युअल बैठक घेतली होती. या बैठकीला कूच बिहार दक्षिणचे निरीक्षक अनुराग यादव देखील उपस्थित होते. त्यांनी या बैठकीवेळी मुख्य निवडणूक आयुक्तांवर टिप्पणी केली. या टिप्पणीनंतर बैठकीतील वातावरण चांगलेच तापले. चिडलेल्या ज्ञानेश कुमार यांनी त्या अधिकाऱ्याला घरी जाण्यास सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यानंतर यादव देखील भडकले आणि त्यांनी तुम्ही आम्हाला असं वागवू शकत नाही. आम्ही २५ वर्षांची सरकारी सेवा दिली आहे. तुम्ही असं बोलू शकत नाही असं म्हणाले.

अनुराग यादव हे प्रिन्सिपल सेक्रेटरी रँकचे अधिकारी आहेत. ते उत्तर प्रदेश सरकारमध्ये कार्यरत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या वादावादीमुळं बैठकीत शांतता पसरली होती. त्यानंतर पुन्हा चर्चा मुद्द्यावर आली. त्यानंतर निवडणूक आयोगाने यादव यांना निरीक्षक पदावरून त्वरित हटवलं.

दरम्यान, निवडणूक आयोगातील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार यादव यांना बैठकीत बंडखोरी केल्याच्या कारणावरून नाही तर त्यांना व्यवहारिक दृष्टीकोणाचा अभाव या कराणामुळं हटवण्यात आलं आहे. या बैठकीवेळी यादव यांना तुमच्या मतदार संघात किती मतदान केंद्रे आहेत असे साधे प्रश्न विचारण्यात आले होते. मात्र त्यांना योग्य माहिती देता आली नाही. त्यामुळं कुमार यांनी त्यांच्यावर टीका केली होती.

निवडणूक आयोग अधिकारी म्हणाला की, 'निरीक्षक हा निवडणूक आयोगाचे डोळे आणि कान असतात. इतके दिवस ग्राऊंडवर घालवल्यानंतर एखाद्या अधिकाऱ्याला मतदार संघात किती मतदान केंद्र या साध्या प्रश्नाचं उत्तर देता येत नसेल तर त्याच्या कामाबद्दलच्या प्रामाणिकपणावर प्रश्न उपस्थित होतात.


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर - जीवनाचे सुधारक व्यक्तिमत्व

*भारतातील संपूर्ण दीनदलितांचे जीवन उद्धारक आंबेडकर ह्यांचे समग्र जीवन हे एक महान समाज सुधारक होते. अखंड देशातील दिनदलितांच्या दुःखाला वाचा फोडणारा हा ज्ञानदाता मानव जीवन सुधारक ठरले. ६ डिसेंबर १९५६ साली अखेर हा दीनदलितांचा महासुर्य मावळला. त्यावेळी सारा समाज ध्याय मोकलून रडला. सागराप्रमाणे ज्ञान लाटा घेवून धडकणारे साकगरात विलीन झाले. परंतू जाता जाता असंख्य ज्ञान स्वरुपाचे किरण सोडून गेले.*

त्या किरणांच्या साहाय्याने अत्यंत मार्मीक असे ध्येय धाडस निर्माण करून गेले. म्हणून आज हा दुबळा समाज बौध्दजीवी होऊ शकला. अखंड देशसेवेची व समाज सेवेची आस हा दुबळा बाळगून डॉ. आबेडकरांचे मन अहोरात्र मग्न असे बुध्द, कबीर, शाहू, सम्राट अशोक यांच्या स्वप्नातील भारत सत्यसृष्टीत उतरविण्यासाठी जे जे आपल्याला करता येणे शक्य होते ते ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आपल्या हातून देश व दीन दुबळ्यांची सेवा घडावी त्यांचा उध्दार व्हावा म्हणून त्यांनी आपल्या वैयक्तिक सुख दुःखाकडे कधीच लक्ष दिले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनात आणले असते तर एखाद्या राजपुत्रासारखे सुखासमाधानाचे ऐश्वर्याचे जीवन जगु शकले असते. परंतू त्यांना हे मान्य नव्हते. देशातील कोटी कोटी दीनदलितांची, कष्टकरी कामगार माणसाची हाक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. या देशातील असंख्य गोरगरिब दलित आपल्या घामावर जगत असून भारतभूमीच्या मातीतून सोने पिकविण्यासाठी उन्हातानात पाऊसवा-यात वाट काढत विद्रुप जीवन जगत आहेत. जणू आपल्याला ही माती साद घालत आहे असे त्यांना नेहमी वाटत असून समाजासाठी पत्करलेला जीवन संघर्ष ऐन तारुण्यात आपली प्रिय पत्नी श्रीमती रमा हीने आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरच सोडून गेल्याचे दुःख ते पार विसरुन गेले होते. तन-मन धनाने, अधिक जोमाने अधिक ताकदिने त्यांनी स्वतःला समाज झोकून घेतले.स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतात का थोडी जातीय भेदाभेद झाली आणि होत आहेत.जातीय भेदाभेदींचे हे होमकुंड सलग पेटतच आहे.रक्तपात चालूच आहे.माणूसाची भौतिक प्रगती होत असली तरी देशातील माणसाची ही युध्दनिती वरचेवर बळवत आहे.याबद्दल डॉ.आंबेडकरांना अतिशय दुःख होत असे.अशा जाती युध्दाने रक्तपाताने माणसाचे प्रश्न सुटत नाहीत. ते वाढतातच आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून त्यांनी भारतातील संपूर्ण समाजाला बुध्दाचा शांतीचा संदेश दिला. ह्या देशातील गरीब, दीनदलित बळकट होऊन समाजाची एकता आणि अखंडता टिकावी म्हणुन खुप प्रयत्न केले. धर्म, जात, पंथ भाषा आदी माणसातील भेद, तात्कालिन आणि कुत्रित स्वरुपाचे मानुन कुठल्याही स्वरुपाचा कलह हा सर्व वर्ज्य मानला व समता आणि बंधुता या तत्वांचा पुरस्कार करुन माणसाचा सर्वांगीण प्रगतीचा पाठपुरावा केला म्हणून त्यांना दलितांचा उध्दारता असे म्हणतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ राजकारणी पुरुषच नव्हते तर ते एक इतिहास तज्ज्ञ ही होते

नासिकेत कृष्णकांत पानसरे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, महाराष्ट्र शासन सन्मानित. ९९३०९९८९७८

ज्या भारतीय संस्कृतीत डॉ. आंबेडकर जन्मले, आणि त्या मातीने त्यांना घडविले तिच्याबद्दल त्यांच्या मनात अफाट प्रेम असून नसल्यासारखे होते. शेकडो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय परंपरेचा आणि संस्कृतिचा त्यांना मुळीच आदर वाटत नसे.



रामायण, महाभारत, वेद, पुराण यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्याच्या उदार तत्वप्रणालीचा कधीच स्वीकार केला नाही. सामान्यतः बालपण, तारुण्य आणि वार्धक्य है मानवी जीवनाचे तीन महत्वाचे आणि ठळक टप्पे आहेत. जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला याच टप्प्याटून प्रवास करावा लागतो.पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी माणसे याला अपवाद असतात.


पण डॉ. आंबेडकरांसारखी माणसे शेवटच्या क्षणापर्यंत उत्साह आणि जोम हा पंचविशीतल्या तारुण्यालाही लांगवेल असा होता. जगत ते तरुण राहीले. मुलात मुल झाले. विद्वानात विद्वान झाले. लाजवेल असा होता. शेवटपर्यंत बालपणाच्या कडू अनुभव जपत तरुणात तरुण झाले पण वृद्धांत वृध्द कधीय झाले नाहीत. मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे. ते कधी संपेल त्याचा नेम नाही. तेव्हा आपण जीवंत आहोत तो पर्यंत का काफलाओढायाचा. जीवन ताजे व तरतरीत व्यक्तिमत्व लाभेलल्या डॉ. आंबेडकरांना आपल्या हाती नेहमी ग्रंथ पुस्तके ठेवण्याचे काय कारण होते. आजही त्याची आठवण झाली की त्याच नितळ पारदर्शी लोभस असे व्यक्तिमत्व आपल्या डोळ्यापुढे साकारत ते त्या ग्रंथालयात त्यांची लिहिलेली पुस्तके बघितल्यावर जणू पुस्तके व ग्रंथ आणि डॉ. आंबेडकर हे दोन्ही एकच होते. त्यांना एकमेकांपासून वेगळ असं काढता येतच नाही. डॉ. आंबेडकरांपासून पुस्तके, ग्रंथ वेगळे काढले तर डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाला परिपूर्णताः येत नाही. त्यामुळे डॉ.आंबेडकर आणि ग्रंथ पुस्तके ग्रंथ बाजूला काढले तर डॉ.आंबेडकरांचे व्यक्तिमत्व ओक-बोक दिसायला लागते.

आयुष्यभर मोठ्या दिमखाने डौलाने डॉ. आंबेडकर या पुस्तकाला आपल्या हातात घेवून छातीला लावत फिरले, त्यांना काय सांगायचे होते या कृतीतून या समाजाला कधी कळलेच नाही. येथे पुस्तकाला महत्व आहे आणि डॉ. आंबेडकरांना तर आहेच आहे. या सहचार्यातुन डॉ. आंबेडकरांचे चिरतारुण्याचे रहस्य उलगडायला बऱ्याच प्रमाणात मदत होते. गुलाबाच्या फुलाबरोबर काटेही असतात तरीही तो सर्वत्र सुगंध पसरवतो. माणसेही आपल्या अविरत

परिश्रमाने अनेक संकटांना तोंड देत आपल्या कर्तुत्वाने जीवनात सुगंध पसरवावा हे जीवन अधिक सुंदर सुशोभित व सुगंधित करावे, वयाची ५० ओलांडल्यावरही दिवसाकाळी पंधरा व अठरा तास वाचत, लिखाण करणाऱ्या डॉ. आंबेडकरांना पुस्तके व ग्रंथामधुन वेगळे असे काय सांगायचे होते. हे आम्ही समजून घेतले पाहिजे.

मातून त्यांचे सौंदर्यपूजक रसिक मन जसे स्पष्ट होते तसेच एकूण मानवी जीवनावर त्यांचे अपार प्रेम व्यक्त होत असे. विश्वास असल्याशिवाय कोणीही एखादी सुंदर वस्तु उभारु शकणार नाही. अशा डॉ. आंबेडकरांचा दृढविश्वास असलेला दिसतो. स्वतःवरील विश्वास व हिंमती शिवाय कोणतीही गोष्ट मोठी नाही. जीवनावर ज्याचा विश्वास नसतो त्याला सर्वत्र कुरुपताच दिसते. जो जीवनावर प्रेम करतो तोच काही तरी निर्माण करू शकतो. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवनात प्रेम केले होते. परंतू देशावर व समाजावर खूप प्रेम केले आहे, हे आपले ज्ञानदाता जीवन उध्दारते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विनम्र अभिनंदन

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संपूर्ण पुणे शहराचा पाणी पुरवठा गुरुवारी बंद

पुणे (दैनिक संध्या) : महापालिकेच्या पर्वती जलकेंद्र अखत्यारीतील पर्वती, वडगाव, लष्कर, एसएनडीटी, वारजे आणि होळकर पंपिंग येथे विद्युत विषयक देखभाल व दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. त्यामुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी (दि. १६ ) बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. पुणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी ही माहिती दिली. पाणीपुरवठा बंद असणाऱ्या भागांमध्ये पर्वती जलकेंद्राच्या अखत्यारीतील शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्य नगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर, स्वारगेट, पर्वती दर्शन, मुकूंदनगर, पर्वतीगाव, सहकारनगर, सातारा रोड, पद्मावती, बिबवेवाडी, तळजाई, कात्रज, धनकवडी, इंदिरानगर, कर्वे रोड ते एसएनडीटी, एरंडवणा, संपूर्ण कोथरूड, डडाणूकर कॉलनी, कर्वेनगर, लॉ कॉलेज रोड, सेमिनरी झोन, मिठानगर, शिवनेरीनगर, भाग्योदयनगर, ज्ञानेश्वर नगर, साईबाबा नगर, सव्र्हे नंबर ४२ व ४६ कोंढवा खुर्द, पर्वती टँकर भरणा केंद्र, पद्मावती टँकर भरणा केंद्र, तर वडगाव जलकेंद्र परिसरातील हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ, कोंढवा बुद्रुक या परिसराचा पाणीपुरवठा बंद असणार आहे. चतु:श्रृंगी, एसएनडीटी, वारजे जलकेंद्र परिसरातील पाषाण, औंध, बोपोडी, खडकी, चतु:श्रृंगी, गोखलेनगर, जनवाडी, रेंजहिल्स, बावधन, बाणेर, चांदणी चौक, किष्किंधानगर, रामबाग कॉलनी, डावी उजवी भुसारी कॉलनी, धनंजय सोसायटी, एकलव्य कॉलनी, महात्मा सोसायटी, गुरू गणेशनगर, पुणे विद्यापीठ, वारजे हायवे, वारजे माळवाडी, रामनगर, अहिरेगाव, पॉप्युलरनगर, अतुलनगर, शाहु कॉलनी, वारजे जलशुद्धीकरण परिसर, औंध बावधन, सूस, सुतारवाडी, भूगाव रोड. नवीन होळकर पंपिंग परिसरातील विद्यानगर, टिंगरेनगर, कळस, धानोरी, लोहगाव, विश्रांतवाडी, विमाननगर, नगर रोड आणि लष्कर जलकेंद्र परिसराच्या अखत्यारीतील लष्कर भाग, पुणे स्टेशन, मुळा रस्ता, कोरेगाव पार्क, ताडीवाला रोड, रेसकोर्स, वानवडी, कोंढवा, हडपसर, महंमदवाडी, काळेपडळ, मुंढवा, येरवडा, विश्रांतवाडी, नगररस्ता, कल्याणीनगर, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी, वडगाव शेरी, चंदननगर, खराडी, सोलापूर रस्ता, गोंधळेनगर, सातववाडी या भागाचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.




### मे महिन्यात गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार, खेड तालुक्यातील परिस्थिती

राजगुरूनगर (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील पूर्व भागातील पाणीटंचाई निर्माण होऊन टँकर सुरु करण्याबाबत पंचायत समितीकडे दाखल झालेल्या १२ गावांपैकी ८ गावांसाठी पिण्याच्या पाण्याकरिता टँकर सुरु करण्याबाबत आमदार बाबाजी काळे यांनी टँकर सुरु करण्याचे निर्देश प्रशासनाला ८ गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजूर होऊन सुरु झाल्याची माहिती खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते यांनी दिली. तालुक्याच्या पूर्व भागातील वाकळवाडी,पूर,गुळाणी या प्रत्येक गावाला दररोज ३ टँकरने, तर वाफगाव, कन्हेरसर, वरुडे गावासाठी दररोज ५ टँकरने पाणी पुरवठा केला जाणार आहे. पश्चिम भागातील कडुस परीसरातील कोहिंडे बुद्रूक येथे दररोज ५ टँकरने, तळवडे येथे दररोज २ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार असून उपलब्ध झालेल्या खासगी टँकरच्या साहाय्याने ८ गावांना ३१ फेऱ्यांच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे उपसभापती मंगेश सावंत, सदस्य दिलीप डुबे, माउली ढेरंगे यांनी सांगितले. खेड तालुक्याच्या अवर्षणप्रवण असणाऱ्या पूर्व भागातील विविध गावांना दरवर्षी पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. या भागातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासनाच्या कृषी विभागांतर्गत नदी ओढा खोलीकरणासह बंधारे बांधण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाला. तर कंपन्यांच्या सीएसआर फंडातून कामे झाली मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे आजही या भागातील विविध गावांना उन्हाळ्यात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असले तरी संपूर्ण खेड तालुक्यातील उन्हाळ्यातील विविध गावे वाड्या - वस्त्यांना टँकर मुक्त करण्याचे धोरण राबवून पाठपुरावा केला जाणार आहे. तसेच पूर्व भागातील शेती जलसिंचनाखाली आणण्यासाठी मंत्रालय पातळीवर प्रयत्न सुरु करण्यात आले आहे. तर पश्चिम भागाच्या धरणांतर्गत पिण्याच्या पाण्याची समस्येवर मात करुन पूल कम बंधाऱ्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करुन अंतिम टप्प्यात आले असल्याचे आमदार बाबाजी काळे यांनी सांगितले.

### MPSC गट-ब भरती 2026 जाहीर; 552 पदांसाठी मोठी संधी उपलब्ध

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त भरती 2026ची अधिकृत अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या भरतीअंतर्गत एकूण 552 रिक्त पदे भरण्यात येणार असून, पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी ही मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, अर्ज करण्यासाठी 30 एप्रिलपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. या भरती मोहिमेअंतर्गत सहायक कक्ष अधिकारी-06 पदे, राज्य कर निरीक्षक-236 पदे, पोलिस उपनिरीक्षक-310 पदे भरली जाणार आहे. शैक्षणिक पात्रता ही पदानुसार वेगवेगळी असून, साधारणपणे मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा समतुल्य असणारी शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही समकक्ष अर्हता पूर्ण केलेली असावी. पीएसआय पदासाठी विशिष्ट शारीरिक पात्रताही लागू आहे. भरती प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराच्या वयोमर्यादेची अट महत्त्वाची मानली जाते. जाहिरातीनुसार, सहायक कक्ष अधिकारी आणि राज्य कर निरीक्षकपदासाठी उमेदवाराचे वय किमान 18, तर कमाल 38 दरम्यान असणे आवश्यक आहे, तर पोलिस उपनिरीक्षकपदासाठी किमान 19 तर कमाल 31 वर्षे यादरम्यान असावे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही भरती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या भरतीकडे राज्यातील हजारो उमेदवारांच्या नजरा होत्या.

# सायबर ठगांकडून ९२ लाखांची फसवणूक

## हॉस्पिटल आणि प्रथितयश डॉक्टरांच्या खात्यातून वळवली रक्कम

बारामती (दै. संध्या)



बारामती शहर व परिसरात सायबर फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून, पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक घोटाळ्याची घटना समोर आली आहे. या वेळी खाते 'कॉम्प्रमाईज' करून तब्बल 92 लाख 50 हजार रुपयांची रक्कम विविध बँक खात्यांमध्ये वळविण्यात आली. ही रक्कम येथील गिरिराज हॉस्पिटल व संबंधित प्रथितयश डॉक्टरांच्या खात्यातून लंपास करण्यात आली आहे.

गेल्या पंधरा दिवसांत सायबर फसवणुकीच्या चार घटना उघडकीस आल्या असून, त्यापैकी तीन शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत, तर एक तालुका पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात घडली आहे. याप्रकरणी अज्ञात सायबर ठगांविरोधात माहिती तंत्रज्ञान अधिनियमासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी दिली.

विशेष म्हणजे, या घटनेत कोणताही संशयास्पद फोन कॉल किंवा ओटीपी शेअर न करता थेट खाते हॅक करून व्यवहार करण्यात आले. आयएमपीएस व आरटीजीएसच्या माध्यमातून ही रक्कम वेगवेगळ्या खात्यांमध्ये वर्ग करण्यात आली. 6 एप्रिल रोजी सकाळी 8 ते 10 या वेळेत हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

बारामती शहर पोलिस ठाणे हद्दीत अलॉकिडील काळात सायबर फसवणुकीच्या तीन गंभीर घटना उघडकीस आल्या आहेत. या तिन्ही घटनांमधून एक अत्यंत महत्त्वाचा धडा समोर आला आहे की, सायबर गुन्हेगार प्रथम नागरिकांचा विश्वास संपादन करतात आणि त्यानंतर विविध युक्त्या वापरून त्यांची आर्थिक फसवणूक करतात, हे स्पष्ट झाले आहे.

**घटना क्र. 1**

74 वर्षीय ज्येष्ठ महिलेला व्हॉट्सअ‍ॅपवर व्हिडीओ कॉल आला. समोरील व्यक्तीने पोलिस अधिकाऱ्याच्या गणवेशात, मी अधिकारी असून, तुमच्याविरुद्ध अटक वॉरंट असल्याचे सांगितले. ज्येष्ठ महिलेला डिजिटल अरेस्टची भीती दाखवत तिच्यावर दबाव निर्माण केला. तपासाच्या नावाखाली त्यांचे पैसे सुरक्षित खात्यात जमा करण्यास सांगण्यात आले. भीतीपोटी महिलेने एफडी रक्कम तोडून वेगवेगळ्या खात्यांवर 45 लाख 60 हजारांची रक्कम पाठवली. त्यानंतर फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

**घटना क्र. 2**

व्हॉट्सअ‍ॅपवरील स्टॉक मार्केट एक्सपर्ट नावाच्या ग्रुपमध्ये एका व्यक्तीला सहभागी करून घेत शेअर मार्केट, आयपीओ व ट्रेडिंगमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखविले. फेक अ‍ॅपद्वारे मोठा नफा होत असल्याचे भासवले गेले. त्यानंतर ट्रेडिंगसाठी रक्कम कमी पडत असल्याचे सांगत त्यांच्या व त्यांच्या पत्नीच्या खात्यातून 1 कोटी 30 लाखांची रक्कम वेगवेगळ्या खात्यांवर भरून घेत फसवणूक केली गेली. त्यानंतर फेक अ‍ॅप बंद केले गेले.

**घटना क्र. 3**

बारामती तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील या घटनेत 68 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक झाली. यूएसएमधील अ‍ॅनिश मॅथ्यू नामक व्यक्तीविरोधात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. तक्रारदाराला मोबाईलवर अज्ञाताची फेंड

रिक्स्वेस्ट आली. त्यानंतर त्या व्यक्तीने ऑनलाइन ट्रेडिंग बिझनेससाठी व्हॉट्सअ‍ॅपवर लिंक देत तक्रारदाराचे खाते काढून दिले. त्यानुसार पहिल्यांदा नफा झाल्याचे सांगत 4,950 रुपयांचा नफा दिला. त्यानंतर ट्रेडिंगसाठी अधिकची रक्कम लागत असल्याचे सांगत सुमारे 68 लाख रुपये फोन-पे व आरटीजीएसद्वारे घेत फसवणूक केली गेली.




## पक्ष मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना बळ देणार : डॉ. श्रीकांत शिंदे

पुणे (दै. संध्या)

राज्यभरातील संपर्क प्रमुख नव्याने नियुक्त करण्यात आले असून, ज्या भागात शिंदेसेना पक्ष कमकुवत आहे, त्या ठिकाणी कार्यकर्त्यांना बळ देऊन पक्ष मजबूत करण्यासाठी बैठका घेतल्या जात असल्याचे शिंदेसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी पुण्याचे संपर्क प्रमुख आणि उद्योग मंत्री उदय सामंत, पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार शरद सोनवणे आदी उपस्थित होते. डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले, पुढील तीन वर्षे कुठल्याही निवडणुका नाहीत. त्यामुळे पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेतला जात आहे, एसआयआरचे मॅपिंग सध्या सुरू आहे. ग्रामीण भागात कोणतीही अडचण येत नाही. मात्र, शहरी भागात यामध्ये नावे सापडण्यास अडचणी येऊ शकतात. त्यामुळे यावर पक्षातील नेते, कार्यकर्त्यांना काम करावे लागणार आहे.

विधानसभा निवडणुकीत पक्षाला चांगले यश मिळाले. त्यानंतर झालेल्या नगरपालिकांमध्ये ६० नगराध्यक्ष निवडून आले. महापालिका निवडणुकीत काही ठिकाणी अपेक्षित यश मिळाले नाही. त्या ठिकाणी पक्ष संघटन मजबूत करण्याच्या सूचना पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्यासाठी नव्याने संपूर्ण राज्यातील संपर्कप्रमुख जाहीर केले आहेत. हे संपर्कप्रमुख आपल्या भागात आढावा बैठका घेत आहेत. तसेच पक्षांतर्गत असलेले मतभेद कमी करण्याचा प्रयत्न करत आहे, असे डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

शिंदेसेना पक्षाने पुणे महापालिकेची निवडणूक ही स्वतंत्र लढवली. उमेदवारी देण्यावरून आरोप - प्रत्यारोप झाले. मात्र, एकही नगरसवेक निवडून आणता आला नाही. पक्षातील गटबाजी याला कारणीभूत असल्याची चर्चा होती. आता महापालिका निवडणुकीत झालेल्या पराभवाचे आत्मचिंतन करण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

## सीए फायनल परीक्षेत मोठा बदल; आता वर्षातून फक्त दोनदाच परीक्षा

पुणे (दै. संध्या)

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया अर्थात आयसीएआयने सीए फायनल परीक्षेच्या पद्धतीत एक मोठा बदल केला आहे. ही परीक्षा वर्षातून तीन वेळा घेण्याऐवजी आता दोनदा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 2026च्या सत्रापासून लागू होणाऱ्या या नवीन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांसाठी परीक्षेच्या संधीची संख्या कमी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यापूर्वी सीए फायनल परीक्षा जानेवारी, मे आणि सप्टेंबरमध्ये घेतली जात होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्षातून तीन संधी मिळत होत्या. परंतु, नवीन निर्णयानुसार ही परीक्षा आता फक्त मे आणि नोव्हेंबरमध्ये घेतली जाईल. आयसीएआयने दिलेल्या माहितीनुसार, हा निर्णय विद्यार्थी आणि इतर संबंधित घटकांकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे घेण्यात आला आहे.

या बदलाचा परिणाम फक्त सीए फायनल परीक्षेवर होईल. फाउंडेशन आणि इंटरमिजिएट परीक्षांसाठी सध्या कोणतेही बदल जाहीर केलेले नाहीत. अभ्यासक्रम, उत्तीर्ण होण्याचे गुण, आर्टिकलशिप किंवा अभ्यासक्रमाच्या रचनेत कोणताही बदल केलेला नाही. सीएची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वी वर्षातून तीन संधी मिळत होत्या, ज्यामुळे अनुत्तीर्ण झाल्यास त्यांना त्वरित दुसरी संधी मिळवता येत होती.

तज्ज्ञांच्या मते, कमी संधीमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे तयारी करण्यासाठी जास्त वेळ मिळेल. शिवाय, परीक्षांची संख्या कमी झाल्यामुळे आयसीएआयसाठी प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे आणि निकाल जाहीर करणे, ही प्रक्रिया सोपी होईल. यामुळे संपूर्ण परीक्षा प्रणाली अधिक मजबूत आणि प्रभावी होण्यास मदत होणार असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

आयसीएआयने सीए इंटरमिजिएट परीक्षेच्या तारखांमध्ये बदल केला आहे. यापूर्वी 3 मे 2026 रोजी होणारी ही परीक्षा आता 5 मे रोजी दुपारी 2 ते सायंकाळी 5 या वेळेत घेतली जाईल. परीक्षा 5, 7 आणि 9 मे रोजी, तर ग्रुप 2 च्या परीक्षा 11, 13 आणि 15 मे रोजी घेण्यात येतील, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

## शिरूरमध्ये एमडी ड्रग्ज जप्त; अल्पवयीन आरोपीकडून 1.38 लाखांचा मेफेड्रोन हस्तगत

### बायपास परिसरात पोलिसांचा सापळा; एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल

पुणे (दै. संध्या)

शिरूर बायपास परिसरात मेफेड्रोन (एमडी) विक्रीसाठी येणाऱ्या एका अल्पवयीन मुलाला स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून 6.94 ग्रॅम वजनाचा सुमारे 1 लाख 38 हजार 800 रुपयांचा मेफेड्रोन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला. ही कारवाई अमली पदार्थविरोधी मोहिमेदरम्यान करण्यात आली. शिरूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बंद पडलेल्या नाना स्पॉट हॉटेलजवळ एमडी विक्री होणार असल्याची गोपनीय



माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कारवाई करत अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याच्याकडे अमली पदार्थ आढळून आला. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायदा कलम 8(क), 21(ब) तसेच बीएनएस कलम 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलिस करत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर व पोलिस निरीक्षक संदेश केंजळे, पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलिस हवालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, राजू मोमीन, संजू जाधव, अक्षय कळमकर, नीरज पिसाळ यांनी केली.

# पाषाण तलावासाठी ८ कोटींचा निधी २ वर्षांपासून पडून

पुणे (दै. संध्या)

पाषाण तलावातील हजारो मासे ऑक्सिजनविना तडफडून मरण पावले. तेव्हा कुठे महापालिका प्रशासन जागे झाले आणि आयुक्तांनी चार जणांना निलंबित केले. परंतु, या पाषाण तलावाच्या संवर्धनासाठी दोन वर्षांपूर्वीच निधी आलेला आहे. तरीही प्रशासन त्यावर काहीच करत नाही. पुणे महापालिकेला १५ व्या वित्त आयोगानुसार राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत (एनडीएमए) कात्रज, पाषाण आणि जांभुळवाडी या तलावाचे संवर्धन करण्यासाठी २१ कोटी ५० लाखाचा निधी आला होता. त्यापैकी कात्रज तलावातील गाळ काढण्याचे काम पाटबंधारे विभागामार्फत पालिकेने सुरू केले. पण, पालिका प्रशासनाच्या उदासीनतेमुळे पाषाण तलावासाठी एकही रुपयाही खर्च झालेला नाही. या तलावातील गाळ काढून तलावाचे संवर्धन झाले असते तर मासे आणि इतर जलचरांचा मृत्यू झाला नसता.



### जलपर्णी काढण्यावर ३ कोटी २७ लाख खर्च, तरीही जलपर्णी जैसे थे

पाषाण तलावातील जलपर्णी काढण्यासाठी पुणे महापालिका पर्यावरण विभागाने आतापर्यंत ३ कोटी २७ लाख खर्च करण्यात आले आहे. यंदाही जलपर्णी काढण्यासाठी १ कोटी खर्चाचे नियोजन आहे. मात्र, प्रत्यक्षात तलाव पूर्णपणे जलपर्णीने व्यापलेला आहे. त्यामुळे जलपर्णी खरोखर काढली जाते का? काम न करता बिले काढली जातात? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### सल्लागाराला बजावली नोटीस

पाषाण तलावातील मृत माशाप्रकरणी चार अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. पाषाण तलावासाठी ज्या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे, त्या सल्लागाराला पालिका प्रशासनाने नोटीस बजावली आहे. नोटीसला उत्तर काय येते, त्यावर पुढील कारवाई केली जाणार आहे.

पाषाण तलावामधील हजारो माशांचा मृत्यू झाला. त्यानंतर या तलावाला आयुक्त नवल किशोर राम यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी विविध धक्कादायक बाबी उघडकीस आल्या. या तलावात १ एमएलडी क्षमतेचा मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) योग्यरीत्या कार्यरत नव्हता. परिणामी, प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट तलावात सोडले जात होते. याचा जलचरांवर गंभीर परिणाम झाला आणि मोठ्या संख्येने माशांचा मृत्यू झाला. १५ व्या वित्त आयोगानुसार राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत कात्रज , पाषाण आणि जांभुळवाडी या तलावाचे संवर्धन करण्यासाठी २१ कोटी ५० लाखाचा निधी आला होता. त्यामध्ये कात्रज, जांभुळवाडी व पाषाण या तलावामधील गाळ काढण्यात येणार होता. त्यात कात्रज तलावातील गाळ जलसंपदाच्या यांत्रिकी विभागाकडून एकदा काढण्यात आला. काढलेला गाळ तलावाशेजारीच ठेवण्यात आला होता. पण, पावसामुळे हा गाळ पुन्हा तलावात गेला. गेल्या काही महिन्यांपासून कात्रज तलावातील गाळ काढला जात आहे. पण, पाषाण तलावातील गाळ हा तलाव रिकामा न झाल्यामुळे काढता येत नाही असे उत्तर प्रशासनाच्या वतीने दिले जाते. पण, या तलावात रोज १५ एमएलडी सांडपाणी येते. त्यामुळे पाषाण तलावात पाणी राहणारच आहे. पालिका प्रशासनाने या सर्वांचा विचार करून या तलावातील गाळ काढण्याचे नियोजन करणे आवश्यक होते. पण, पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागासह पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. पाषाण तलावातील पाण्याची तपासणी करण्यात आली.